सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. ०४ सप्टेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक १५३ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मंत्रिमंडळात १५ महत्त्वाचे निर्णय, मुंबई-ठाणे-मेट्रो प्रकल्पांना गती

मुंबई : राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज (दि. ३ सप्टेंबर) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या बैठकीत सामाजिक न्याय, ऊर्जा, कामगार, आदिवासी विकास, नगरविकास तसेच विधि व न्याय विभागाशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. बैठकीत घेतलेल्या निर्णयांमुळे राज्यातील सामाजिक सुरक्षाव्यवस्था, औद्योगिक विकास व पायाभूत सुविधा मजबूत होणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. सामाजिक न्याय विभागाच्या निर्णयानुसार संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेंतर्गत दिव्यांगांच्या अर्थसहाय्यात एक हजार रुपयांची वाढ करण्यात आली असून लाभार्थ्यांना दरमहा अडीच हजार रुपये मिळणार आहेत. याअंतर्गत दिव्यांगांना पूर्वीच्या १,५०० रुपयांऐवजी दरमहा २,५०० रुपयांचे सहाय्य मिळणार आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील हजारो लाभार्थ्यांना थेट आर्थिक दिलासा मिळणार आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोण कोणते निर्णय घेतले त्याबाबत पाहूयात...

आज (०३ सप्टेंबर)च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेले निर्णय खालीलप्रमाणे-

सामाजिक न्याय विभागाचे निर्णय

संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेत लाभार्थ्यांना आता दरमहा २,५०० रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार आहे. याआधी हा हप्ता १,५०० रुपये होता. म्हणजेच १,००० रुपयांनी थेट वाढ करून लाभार्थ्यांना सरकारी मदतीत बळ दिले आहे.

ऊर्जा विभागाचा निर्णय



महानिर्मिती कंपनीच्या सर्व औष्णिक विद्युत केंद्रांमधून निर्माण होणाऱ्या फ्लाय ॲश (राखेच्या व्यवस्थापन व पुनर्वापरासाठी विशिष्ट धोरण आता निश्चित करण्यात आले आहे. यामुळे पर्यावरणपूरक उपाययोजनांना चालना मिळेल.

कामगार विभागातील सुधारणा

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरी व सेवाशर्ती विनियमन) अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा

कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये सुधारणा

या सुधारणांमुळे औद्योगिक संबंध अधिक सक्षम होतील आणि कामगारांना अतिरिक्त सुविधा मिळतील.

आदिवासी विकास विभाग

अनुसूचित जमातीतील नववी-दहावीच्या विद्यार्थ्यांना यापुढे राज्याची सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजना न मिळता केंद्र सरकारची पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू होणार आहे.

नगर विकास विभाग

मुंबई मेट्रो मार्गिका-११ (डिपो वडाळा - गेटवे ऑफ इंडिया) प्रकल्पास मंजुरी. यासाठी तब्बल २३,४८७ कोटी ५१ लाखांची तरतूद.

नगर विकास विभाग

ठाणे शहराचा प्रवास सुलभ करण्यासाठी वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाला केंद्र आणि राज्य शासनाची मंजुरी मिळाली आहे. हा प्रकल्प २९ किलोमीटर लांब असून, त्यात २२ स्थानके असणार आहेत. त्यापैकी २ स्थानके भूमिगत, तर उर्वरित स्थानके उन्नत स्वरूपाची असतील. ठाण्यातील विविध भागांना जोडणारा हा प्रकल्प वाहतुकीची समस्या कमी करण्यासाठी महत्त्वाचा ठरेल. पुणेतील मेट्रो प्रकल्पांतर्गत मार्गिका-२ आणि मार्गिका-४ साठी आवश्यक कर्ज मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये पुणे-लोणावळा लोकलसाठी नवीन मार्गिकाही समाविष्ट आहेत. पुणे-चिंचवड, स्वारगेट-कात्रज आणि वनाज-रामवाडी यांसारख्या मुख्य मार्गिकांच्या विस्तारीत भागासाठीही निधी मंजूर झाला आहे. या सर्व मेट्रो प्रकल्पासाठी लागू होणाऱ्या बाह्यसहाय्यित कर्जाचे आकस्मिक दायित्व स्वीकारले गेले आहे.

# मॅरेथॉन स्पर्धेबाबत झाला महत्त्वाचा निर्णय

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त १७ सप्टेंबरपासून २ ऑक्टोबरपर्यंत सेवा पंधरवडा देशभरात साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत युवकांमध्ये क्रीडाप्रेम जागविण्यासाठी व निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी देशभरातील ७५ ठिकाणी नमो मॅरेथॉन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय युवा कार्य व क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दिली. या संदर्भात झालेल्या दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत डॉ. मांडविया यांनी राज्यांच्या क्रीडा मंत्र्यांशी संवाद साधला. यावेळी केंद्रीय युवा कार्य व क्रीडा विभागाचे सचिव हरिरंजन राव उपस्थित होते. राज्याचे क्रीडा मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांच्यासह विविध राज्यांचे क्रीडा मंत्रीही उपस्थित होते. मंत्री डॉ. मांडविया



म्हणाले की, युवकांचे आरोग्य सक्षम ठेवणे आणि त्यांच्यात राष्ट्रप्रेम जागवणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे या कार्यक्रमांना प्रत्येक राज्याने सक्रिय सहभाग देऊन यशस्वी करावे.

पंधरवड्यात २१ सप्टेंबर रोजी ७५ ठिकाणी नमो मॅरेथॉनचे आयोजन करण्यात येणार आहे. तर, यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर : एकतेचा संदेश देणाऱ्या पदयात्रेचे आयोजन देशभर करण्यात येणार आहे. याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यांत तीन दिवस एकता, राष्ट्रप्रेम, एक भारत श्रेष्ठ भारत व विकसित भारत यांचा संदेश देणाऱ्या पदयात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे.

भारतात नशा मुक्त भारत अभियान राबविण्यात येणार आहे. देशभरातील १०० सामाजिक व अध्यात्मिक संस्थांचा सहभाग घेऊन हे अभियान राबविण्यात येणार आहे. तसेच संसद खेल महोत्सवाचे आयोजनही करण्यात येणार असून, राज्यांनी यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी यावेळी केले.

# विक्रमादित्य वैदिक घड्याळाचे उज्जैनमध्ये अनावरण

उज्जैन : बहुचर्चित विक्रमादित्य वैदिक घड्याळ आणि मोबाइल पचे अनावरण मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. या माध्यमातून अचूक वेळ समजू शकेल. कालगणनेची ही वैदिक पद्धत भारताचा समृद्ध प्राचीन, सांस्कृतिक वारसा असल्याचे अभ्यासकांनी म्हटले आहे. या घड्याळाच्या निर्मितीमध्ये राज्याच्या उच्चशिक्षण आणि सांस्कृतिक विभागाने मोलाची भूमिका पार पाडली. या वैदिक कालगणनेमध्ये पहिल्या सूर्योदयापासून ते दुसऱ्या सूर्योदयापर्यंतचा काळ विचारात घेण्यात येतो. यातही वेळेचे तीस तासांमध्ये विभाजन करण्यात येते. त्यातील प्रत्येक तासांमध्ये ४८ मिनिटांचा समावेश आहे. सूर्योदयाला हे घड्याळ सुरू होते ते



पुढील तीस तास चालते.इंग्रजी तारखांमध्ये सातत्याने बदल होत असतो पण भारतीय दिनदर्शिका ही मात्र ऋतुचक्र आणि निसर्गाशी संबंधित असल्याचे मुख्यमंत्री यादव यांनी यावेळी सांगितले. या पमध्ये १८९ पेक्षाही अधिक भाषांचा समावेश असून नागरिकांना या माध्यमातून केवळ दिनदर्शिकाच नाही तर सात हजार वर्षांची दुर्मिळ धार्मिक माहिती मिळू शकेल. श्रावण आणि भाद्रपद महिन्यातील पर्जन्यवृष्टी तसेच ऋतुचक्रातील अन्य बदल या वैशिष्ट्यपूर्ण कालगणनेच्या माध्यमातून समजू शकतील. अमावस्या आणि पौर्णिमेला जसा चंद्र आणि समुद्रावर परिणाम

# खातेअंतर्गत PSI परीक्षेचा मार्ग मोकळा, मिळणार २५ टक्के आरक्षण

## राज्य सरकारने पीएसआय पदासाठी विभागीय परीक्षा पुन्हा सुरू केली

मुंबई: राज्य सरकारने पीएसआय पदासाठी २५ टक्के आरक्षणासह खातेअंतर्गत विभागीय परीक्षेचा मार्ग पुन्हा एकदा मोकळा केला आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये खातेअंतर्गत परीक्षा बंद करण्यात आली होती, मात्र पुन्हा एकदा या परीक्षेला हिरवा कंदील मिळाला असल्याकारणामुळे, शासनाच्या या निर्णयाने मेहनती आणि अनुभवी पोलीस कर्मचाऱ्यांना अधिकारी होण्याची सुवर्णसंधी लाभणार आहे.

पोलीस कॉन्स्टेबल आणि अधिकाऱ्यांना पोलीस उपनिरीक्षक पदांवर बढतीची नवीन संधी

राज्य सरकारनं पोलीस दलाबाबत मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने पोलीस उपनिरीक्षक पदासाठी खातेअंतर्गत



विभागीय परीक्षा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, राज्यातील पोलीस अंमलदारांना आता पीएसआय होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांना कमी वयातच झडख पदावर पदोन्नती मिळेल. तसेच पोलीस दलात तरुण आणि ऊर्जावान अधिकारी दीर्घकाळापर्यंत सेवेत राहू शकतील. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे हजारो पोलीस कर्मचाऱ्यांच्या करिअरला भरारी मिळणार आहे. साधारणपणे पोलीस कॉन्स्टेबलला प्रमोशनद्वारे झडख पद मिळते. पण ते त्यांच्या सेवाकालाच्या शेवटच्या टप्प्यात मिळते. त्यामुळे त्यांना झडख म्हणून फारतर दोन ते तीन वर्षे च काम करता येत असते. मात्र, विभागीय परीक्षेतून पीएसआय झालेल्या अधिकाऱ्यांना कमी वयातच पदोन्नती मिळणर आहे. जेणेकरून पोलिस अंमलदार तसेच अधिकाऱ्यांना त्यांच्या झडख च्या पदासाठी शेवटच्या सेवांकालची प्रतीक्षा करावी लागणार नाही! दरम्यान गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी पोलीस खातेअंतर्गत विभागीय परीक्षा सुरू करण्याची मागणी केली होती.

गृह राज्यमंत्री योगेश कदम यांची खातेअंतर्गत विभागीय परीक्षा पुन्हा सुरू करण्याची मागणी

गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी एप्रिल २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून पोलीस उपनिरीक्षक (झडख) पदासाठीची खातेअंतर्गत विभागीय परीक्षा पुन्हा सुरू करावी अशी मागणी केली होती. पूर्वी किमान पाच वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या पोलीस अंमलदारांना पीएसआय पदासाठी २५ टक्के आरक्षण देण्यात येत होते मात्र फेब्रुवारी २०२२च्या शासन निर्णयानुसार ही परीक्षा बंद करण्यात आली होती. यानंतर योगेश कदम यांनी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून परीक्षा पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न केले. दरम्यान आज अखेर शासनाने आज अधिकृत निर्णय घेतला गेला. पोलीस दलातील मेहनती, कर्तव्यनिष्ठ आणि तरुण पोलीस अंमलदारांना अधिकारी म्हणून पुढे जाण्याची संधी मिळावी यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरेल असं मंत्री योगेश कदम यांनी या निर्णयावर प्रतिक्रिया देताना म्हंटले आहे.

# बीड ते परळी रेल्वे मार्गाबाबत झाला हा निर्णय

मुंबई : रेल्वेमार्गापासून दूर असलेले बीड शहर लवकरच रेल्वेच्या नकाशावर येणार आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडी सुरू करण्यात येणार आहे. यामुळे अनेक वर्षापासूनचे बीडवासियांचे रेल्वेसेवेचे स्वप्न पूर्ण होणार आहे. येत्या १७ सप्टेंबर रोजी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत घेण्यात आला. उर्वरित



बीड ते परळी वैजनाथ या रेल्वे मार्गातील अडथळे दूर करून गतीने काम पूर्ण करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, बीड ते परळी वैजनाथ रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाचे प्रलंबित प्रकरणे बीड जिल्हा प्रशासनाने तातडीने निकाली काढून आवश्यक जमीन उपलब्ध करून द्यावी. या रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाच्या हिस्स्याची रक्कम तातडीने अदा करण्यात यावी. अर्थसंकल्पात मंजूर १५० कोटी रुपये देण्यात यावे. उर्वरित १५० कोटी रुपयांची तरतूद करावी. रेल्वेने आतापर्यंत दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी.

फलटण ते लोणंद या रेल्वे मार्गावरील प्रलंबित कामे पूर्ण करावीत. बारामती रेल्वे स्थानकाच्या कामाला रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी द्याव्या. तसेच कामाला गती देऊन पुढील काळात सुसज्ज रेल्वे स्थानक प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध करून द्यावे, असे निर्देशही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.

असा आहे अहिल्यानगर - बीड - परळी रेल्वे मार्ग

रेल्वे मार्गाची एकूण लांबी २६१.२५ किलोमीटर, जमिनीचे एकूण भूसंपादन १८२२.१६८ हेक्टर, रेल्वे खालील एकूण पूल १३०, रेल्वे वरील पूल ६५, मोठ्या पुलांची संख्या ६५, छोटे पूल ३०२, द्वितीय प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत ४८०५.१७ कोटी, प्रकल्पाच्या समप्रमाणात ५०:५० टक्के हिस्सा नुसार केंद्र व राज्य शासनाचा प्रत्येकी हिस्सा २४०२.५९ कोटी.

# मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत मोठी घोषणा

मुंबई : जात प्रमाणपत्र देणे आणि त्याची पडताळणी करणे याकरिता २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३ व त्याअंतर्गत कार्यपद्धती निश्चितीकरिता नियम तयार करण्यात आलेले आहेत. यामध्ये हैद्राबाद गॅझेटिअरमधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया अधिक सोपी करण्यासाठी गावपातळीवर समित्या गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने प्रसिद्ध केला आहे.

गावपातळीवर गठीत समितीमध्ये ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, सहायक कृषी अधिकारी यांचा समावेश असेल. मराठा समाजातील भूधारक तसेच भूमिहीन, शेतमजूर किंवा बटईने शेती करत असलेल्या व्यक्तींकडे शेत जमिनीची मालकी असल्याचा पुरावा नसल्यास त्यांनी १३ ऑक्टोबर १९६७ पूर्वीचे वास्तव्य दाखविणारे प्रतिज्ञापत्र सादर करावे. तसेच, त्यांच्या कुळातील किंवा नातेसंबंधातील व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळाले असल्यास व त्यांनी अर्जदारासंबंधी प्रतिज्ञापत्र दिल्यास, स्थानिक समिती आवश्यक चौकशी करून अहवाल सादर करेल. सक्षम प्राधिकारी या चौकशीच्या आधारे अर्जदारास कुणबी जातीचा दाखला देण्याचा निर्णय घेतील. याबाबतची कार्यपध्दती शासन निर्णयात नमूद करण्यात आली आहे.




# १८ वर्षांनी अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळीची नागपूर तुरुंगातून सुटका!

नागपूर : अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळी यांची १८ वर्षांनंतर नागपूर मध्यवर्ती कारागृहातून सुटका करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून मिळालेल्या जामिन आदेशानंतर बुधवारी दुपारी त्यांची सुटका झाली. गवळी यांच्या सुटकेमुळे नागपूरसह मुंबईत आणि राजकीय वर्तुळात हलचल निर्माण झाली आहे. सुटकेच्या वेळी मीडियाचा प्रचंड जमाव तुरुंगाबाहेर गोळा झाला होता. मात्र पोलिसांनी सुरक्षा कारणास्तव गवळी यांची सुटका थेट मागच्या गेटने केली. त्यामुळे मीडियाला चकवा देत त्यांना बाहेर काढण्यात आले. या प्रकारामुळे पत्रकार व नागरिकांमध्ये उत्सुकता अधिकच वाढली.

सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

अरुण गवळी यांना सर्वोच्च न्यायालयाने नुकताच जामीन मंजूर केला होता. त्यानुसार नागपूर मध्यवर्ती कारागृह प्रशासनाने आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांची मुक्तता केली. गवळी यांना हा दिलासा मिळाल्यानंतर त्यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

नगरसेवक हत्याप्रकरणी भोगत होता शिक्षा

गवळीला शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली होती. गेल्या १८ वर्षांपासून तो नागपूर मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत होता. आता जामिनावर सुटका झाल्यानंतर गवळीच्या भविष्याच्या हालचालींकडे सर्वांचे लक्ष वेधले जात आहे. अरुण गवळी हा केवळ अंडरवर्ल्डपुरता मर्यादित नसून, त्यांनी राजकारणातही पाऊल टाकले होते. त्यामुळे त्यांच्या सुटकेनंतर मुंबईच्या राजकीय व गुन्हेगारी वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. गवळीच्या पुढील कृतींवर आणि हालचालींवर राज्यातील सुरक्षा यंत्रणांचे बारकाईने लक्ष असेल.

कुख्यात गँगस्टर अरुण गवळी अखेर तुरुंगातून बाहेर

कुख्यात गँगस्टर अरुण गवळी सुटकेनंतर नागपूरहून विमानाने थेट मुंबईकडे रवाना होणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. विमानतळ परिसरात गोंधळ होऊ नये म्हणून कडेकोट सुरक्षा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मुंबईत २००७ मध्ये शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांच्या भरदिवसा घाटकोपर येथील निवासस्थानी झालेल्या निर्घृण हत्येप्रकरणी अरुण गवळी याला जन्मठेपेची शिक्षा झाली होती. त्यानंतर तो नागपूर मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत होता. गेल्या १८ वर्षांपासून गवळी जामिनासाठी सतत कायदेशीर प्रयत्न करत होता. अखेर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी त्याला जामीन मंजूर केला. या निर्णयानंतर त्याच्या सुटकेचा मार्ग मोकळा झाला. नागपूर तुरुंगातून बाहेर पडतानाच त्याच्यावर पुन्हा एकदा प्रचंड प्रकाशझोत पडला आहे. कुख्यात गँगस्टर असूनही गवळीने राजकारणात प्रवेश केला होता आणि त्याचा प्रभाव काही भागांत दिसून येत होता. त्यामुळे त्याच्या सुटकेनंतर पुन्हा एकदा मुंबईतील राजकीय आणि गुन्हेगारी वर्तुळात चर्चा सुरू झाल्या आहेत. पुढील काळात गवळी कोणत्या मार्गाने वाटचाल करतो, याकडे राज्यातील गुप्तचर यंत्रणांसह सर्वांचे लक्ष लागले आहे.

भरदिवसा शिवसेना नगरसेवकाची हत्या

मुंबईतील घाटकोपर येथे २००७ साली शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांची त्यांच्या राहत्या घरी भरदिवसा निर्घृण हत्या करण्यात आली होती. या थरारक हत्याकांडामुळे संपूर्ण मुंबई हादरली होती आणि याच प्रकरणात अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली गेली होती. गेल्या १८ वर्षांपासून गवळी नागपूर मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत होता. अनेक वर्षांच्या कायदेशीर लढ्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने अखेर त्याला जामीन मंजूर केला. या निर्णयामुळे त्याच्या सुटकेचा मार्ग मोकळा झाला असून समर्थकांकडून आनंद व्यक्त केला जात आहे.

# पोलिस प्रशिक्षण केंद्रात तब्बल १७० पोलिसांना अन्नातून विषबाधा

सोलापूर: सोलापूरमधील पोलीस प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी पोलिसांना विषबाधा झाल्याने मोठी खळबळ उडाली. यातील १७ प्रशिक्षणार्थींवर पोलिसांवर सिव्हिल रुग्णालयात उपचार सुरु आहेत. प्राथमिक तपासात अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून अधिकृत कारण शोधण्यासाठी संबंधित विभाग कार्यरत आहे. प्राथमिक माहितीनुसार,पहाटेच्या सुमारास अनेक प्रशिक्षणार्थींना उलटी, जुलाब आणि मळमळ होण्याचा त्रास जाणवला. त्यानंतर एकामागून एक प्रशिक्षणार्थी आजारी पडत गेल्याने वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. यामधील १७ जणांवर विशेष उपचार सुरू आहेत, तर उर्वरितांची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय प्रशासनाने सांगितले. सोलापूर पोलीस प्रशिक्षण केंद्रात सध्या जवळपास १,४०० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत. यापैकी मोठ्या संख्येने बाधित झाल्याने खळबळ उडाली आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### बँकेतील खाते सक्रिय ठेवण्यासाठी तात्काळ केवायसी करा

परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेद्वारे सभासदांना आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार बँकेत असलेली खाती सक्रीय ठेवण्यासाठी सर्व सभासदांची केवायसी अपडेट करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील सर्व कास्तकार, शेतकरी, सभासद व खातेदारांनी आधारकार्ड व पॅनकार्डची स्वसाक्षांकित प्रत तात्काळ संबंधित शाखेत जमा करावी.

वेळेत कागदपत्रे न दिल्यास बँक व्यवहारांमध्ये अडचण येऊ शकते, असे बँकेकडून सांगण्यात आले आहे. तसेच सर्व खातेदारांनी आपल्या खात्यावर वारसाची नोंदणी करून, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन बँकेचे अध्यक्ष सुरेश अंबादासराव वरपुडकर, उपाध्यक्ष राजेश साहेबराव पाटील तसेच सर्व संचालक मंडळ सदस्यांकडून करण्यात आले आहे.

### मटकऱ्हाळ्यात शेतऱ्यांनी साकारला कर्जमाफी आणि हमीभावाचा मुद्दा अधोरेखित करणारा अनोखा देखावा

: प्रहारचे अध्यक्ष बच्चुभाऊ कडू यांच्या आवाहनाला प्रतिसाद

**परभणी,/प्रतिनिधी :** प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चुभाऊ कडू यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मटकऱ्हाळा येथील शेतकऱ्यांनी महालक्ष्मी पुजनाच्या वेळी कर्जमाफी आणि हमीभावाचा मुद्दा अधोरेखित करणारा अनोखा देखावा सादर केला.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफी आणि हमीभावाच्या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चुभाऊ कडू हे मागील अनेक दिवसांपासून विविध आंदोलनांच्या माध्यमातून लढा देत आहेत. या मागण्यांसाठी त्यांनी अमरावती जिल्ह्यातील मोझरी येथे सलग आठ दिवस अन्नत्याग आंदोलन केले होते. त्यावेळी राज्य सरकारने आश्वासन दिले होते; मात्र अद्यापही त्या आश्वासनांची अंमलबजावणी झालेली नाही. या पार्श्वभूमीवर बच्चुभाऊ कडू यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत परभणी तालुक्यातील मटकराळा येथील शेतकऱ्यांनी महालक्ष्मी पूजनाच्या वेळी अनोखी पद्धत अवलंबली. कर्जमाफी आणि हमीभावाच्या मागण्यांकडे समाजाचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी आपल्या घरात यावर आधारित देखावे सादर केले.

या उपक्रमासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे परभणी तालुकाप्रमुख उद्धव गरुड यांनी पुढाकार घेतला. मटकराळ्यातील अनेक शेतकरी या उपक्रमात सहभागी झाले. शेतकऱ्यांच्या या सर्जनशील आंदोलनामुळे कर्जमाफी आणि हमीभाव या दोन महत्त्वाच्या मुद्द्यांवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

### पूर्णेतील कार्यकर्त्यांनी दिलेल्या तात्काळ मदतीने अपघातग्रस्त व्यक्तीस जीवदान

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णेतील सहा-सात कार्यकर्त्यांनी एका रस्ते अपघातात गंभीर जखमी व्यक्तीस तात्काळ मदतीचा हात देऊन माणुसकीचा धर्म पाळला....

सोमवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास भर पावसात एक मोटारसायकलस्वार पूर्णा रस्त्यावर गंभीर जखमी अवस्थेत विव्हळत होता. रस्त्यावर रक्त सांडले होते. त्या मोटारसायकलस्वाराच्या डोळ्याजवळ मोठी जखम झाली होती. परंतु, ये-जा करणाऱ्या काही नागरीकांनी त्या व्यक्तीस मदतीचा हात तर दिलाच नाही, तेथून पोबारा केला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप ननवरे हे नांदेडहून येऊ लागले होते. अपघातग्रस्त मोटारसायकलस्वारास पाहिल्याबरोबर ननवरे यांनी क्षणाचाही विलंब न करता तात्काळ रुग्णवाहिकेशी संपर्क साधला. अन् त्या व्यक्तीस तात्काळ ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचाराची व्यवस्था केली. डॉक्टर आकाश उमाटे यांच्यासह अन्य कर्मचारी व परिचारिकांनी या जखमीस प्राथमिक उपचार करीत पुढील उपचाराकरीता नांदेडला हलविले. तोपर्यंत ननवरे यांनी त्या मोटारसायकलस्वाराच्या नातेवाईकांशी संपर्क साधून घटनेबद्दल माहिती दिली, त्यांना बोलावून घेतले. ननवरे यांच्याबरोबर संदीप गायकवाड, राजकुमार वावळे, रुग्णवाहिका चालक कैलास ढेंबरे, पवन दवणे, राजकुमार वावळ यांचे सहकार्य लाभले.

### जिल्ह्यात आज यलो अलर्टचा इशारा जिल्हा प्रशासनाद्वारे खबरदारी म्हणून सर्वतोपरि उपाययोजना

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतीय हवामान खाते, प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार परभणी जिल्ह्याकरीता ३ सप्टेंबर या दोन दिवशी यलो अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत जिल्ह्यात वादळी वारे व विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरीकांनी सर्वतोपरि खबरदारी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती अनुराधा ढालकरी यांनी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. आपत्कालीन स्थितीत काय करावे आणि काय करु नये या संबंधीच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. दरम्यान दिनांक २ सप्टेंबर रोजी सकाळपासूनच जिल्हयात पावसाने आपली जोरदार हजेरी लावली आहे.त्यामुळे अनेक जणांना याचा त्रास सहन करावा लागला होता.

# गॅझेट अध्यादेश रद्द करण्यासाठी गंगाखेडला ओबीसींची निदर्शने

**मोहन धारासूरकर**

**गंगाखेड/प्रतिनिधी-** गॅझेट अध्यादेश रद्द करण्यासाठी गंगाखेडला ओबीसींची निदर्शने तहसील समोर होणार अखंड धरणे आंदोलन गंगाखेड येथे करण्यात आले होते.



मराठा समाजाला आरक्षण द्यावे, पण ते ओबीसीतून असू नये अशी मागणी आज गंगाखेड ओबीसींच्या वतीने करण्यात आली. या मागणीचे निवेदन तहसीलदारांना देत तहसीलच्या प्रांगणात घोषणाबाजी करण्यात आली. दरम्यान, ओबीसी हिताच्या विविध मागण्यांसाठी तहसील समोर अखंड धरणे आंदोलन करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. मराठा आरक्षणाचा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे. मराठा समाजातील झुंडशाहीसमोर नमते घेत राज्य सरकार राज्य घटनेशी विसंगत शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयामुळे आपले आरक्षण संपुष्टात येण्याची भिती ओबीसी समाजात निर्माण झाली आहे. सदरील अध्यादेश रद्द करावा, यासाठी लढा देण्याचा निर्णय ओबीसी नेते छगन भुजबळ, प्रा. लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे, अॅड. मंगेश ससाने यांच्या उपस्थितीत घेण्यात आला आहे. यास अनुसरून आज गंगाखेड येथे सकल ओबीसी समाजाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले. मराठा समाजास ओबीसीतून न देता स्वतंत्र आरक्षण द्यावे, शिंदे समिती तात्काळ बरखास्त करावी, मागील दोन वर्षात वाटप करण्यात आलेले बोगस कुणबी जात प्रमाणपत्र रद्द करावेत आदी मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आल्या. या प्रसंगी ओबीसी समन्वय समितीचे गोविंद लटपटे, गोविंद यादव, बालाजी मुंडे, गोविंद मानवतकर, अॅड साधना राठोड, सुरेश बंडगर, मनोज मुरकुटे, रामेश्वर भोळे, बालासाहेब पारवे, संदिप केंद्रे, लक्ष्मण लटपटे, योगेश फड, केशव लटपटे, धीरज मुंडे, सागर गोरे, अशोक मुंडे, केशव लटपटे, डिगंबर यादव, गजानन देवकते, अरूण मुंडे, विनायक सोन्नर, अॅड डी. टी. मुंडे, सतिष पोले, श्रीमंत नागरगोजे, नारायण परकड, भगीरथ फड, रमेश खांडेकर, अनिल गोरे, रखमाजी तेलंग, प्रदीप फड, नरसींग लटपटे आदिंसह बहुसंख्य ओबीसी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिंतूर येथील पुजा रोकडे सेट परिक्षा उत्तीर्ण

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर येथील पुजा विठ्ठलराव रोकडे हिने गणित (मॅथेमॅटीकल सायन्स) विषयातील राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) २०२५ उत्तीर्ण केली असून शिक्षक पात्रता परीक्षेमध्येही १४७ गुण मिळवून दुहेरी यश संपादन केले आहे.



कुटुंबीयांचे नाव उज्ज्वल करताना पुजाने मातृत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडत, केवळ पाच महिन्यांच्या मुलीची काळजी घेत अभ्यास केला. तिच्या या यशात पती प्रा. सुंदर कदम यांचा मोलाचा वाटा आहे. पुजाच्या या यशाबद्दल ऊर्जा राज्यमंत्री व परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी अभिनंदन केले. तसेच कै. वामनरावजी बोर्डीकर संस्थेच्या सचिव मीनाताई बोर्डीकर, तुळजाभवानी साखर कारखान्याच्या चेअरमन सौ. भावनाताई बोर्डीकर, हनुमान शिक्षण मंडळ देवाठणा अध्यक्षा नर्मदा मामी जोगदंड, कार्यवाहक विष्णू नाना जोगदंड, ज्ञानोपासक महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीधर भोंबे, जय किसान विद्यालयाचे प्राचार्य अनंत काळे तसेच प्रा. डॉ. कोतवाल, डॉ. चोपडे, प्रा. निळे, डॉ. प्रभाकर अंभुरे, सुभाष मुळी आणि अन्य मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### सुकळीतील रवि कोसे यांचेही सेट परिक्षेत यश...

जिंतूर तालुक्यातील सुकळी येथील रवि तुकाराम कोसे यांनी रसायनशास्त्र (केमिकल सायन्स) विषयातील राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.

कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले असून सर्वत्र त्यांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे. रवि कोसे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल माजी मंत्री गणेशराव दुधगावकर, डॉ. संध्या दुधगावकर, माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, मराठवाडा सर्वोदय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा आशा आकात, सचिव कपिल आकात, प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे, डॉ. भारत खंदारे, प्रा. पांडुरंग निळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### नांदखेडयातील मारहाणीत गंभीर जखमी ग्रामस्थाचा मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी तालुक्यातील नांदखेडा या गावी शस्त्रास्त्राने केलेल्या हल्ल्यात एका ग्रामस्थाचा मृत्यू झाला. सोमवारी रात्री सव्वा आठ वाजेच्या सुमारास ही दुर्देवी घटना घडली. दरम्यान, या घटनेबद्दल परभणी ग्रामीण पोलिस ठाण्यात परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शंकर पंढरीनाथ आब्दागिरे यांनी ग्रामीण पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत, आरोपीला तू माझ्या भावास नेहमी शिवीगाळ करुन खुपसून टाकण्याची धमकी का देतो म्हणून विचारणा केली असता आरोपीने संगणमत करीत चाकूने, लोखंडी रॉडने वार केले त्यात भाऊ अर्जून आब्दागिरे यांचा मृत्यू झाला असे म्हटले. दरम्यान, लखन सुरेश जाधव, शाम सुरेश जाधव, रमेश तुकाराम जाधव, रोहन उर्फ सिध्दार्थ रमेश जाधव, सुरेश तुकाराम जाधव, राम सुरेश जाधव, अशोक सुरेश जाधव यांच्या विरोधात या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तर राम सुरेश जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आरोपीने संगणमत करीत आपणास आज तुझा खात्मा करुन टाकतो असे म्हणत जबर मारहाण केली. लखन जाधव याच्यावर चाकूने पोटात, छातीवर आणि पाठीवर वार करीत गंभीर जखमी केले, अशोक जाधव, सुरेश जाधव, रमेश जाधव यांनाही गंभीर दुखापत झाली, असे म्हटले. त्याआधारे पोलिसांनी शंकर पंढरी आब्दागिरे, अर्जून पंढरी आब्दागिरे व पंढरी आब्दागिरे व एका अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल केला.

## आर.पी. हॉस्पिटलने दिले एक किलो वजनाच्या नवजात बालकाला नवजीवन

**परभणी,/प्रतिनिधी-** येथील पाथरी रस्त्यावरील आर.पी. हॉस्पिटलच्या नियोनेटल इंटेन्सिव्ह केअर युनिट () मधून १००० ग्रॅम वजनाच्या अकाली जन्मलेल्या नवजात बालकाला ६० दिवसांच्या अथक उपचारानंतर नवजीवन मिळाले.

सात महिन्यांत जन्मलेल्या या बालकाची अवस्था अत्यंत नाजूक होती. बालरोगतज्ञ डॉ. बाबासाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय तज्ञांच्या टीमने अत्याधुनिक उपचार पद्धती आणि कौशल्याचा वापर करून यशस्वी उपचार केले. विशेष म्हणजे, बालकाच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिकट असतानाही हॉस्पिटलने कोणताही भेदभाव न करता संपूर्ण उपचार प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली आणि या लहान जिवाला नवजीवन बहाल केले.

जन्मतःच या बालकाला रेस्पिरेटरी डिस्ट्रेस सिंड्रोम () म्हणजेच फुफ्फुसांचा पूर्ण विकास न झाल्याने श्वसनाचा त्रास होत होता. त्याला तातडीने व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. ३१ दिवसांच्या व्हेंटिलेटर उपचारानंतर बालकाच्या प्रकृतीत सुधारणा दिसू लागली. त्यानंतर त्याला सिपॅप ( - ) आणि नंतर हाय फ्लो नेझल कॅन्युलावर ठेवण्यात आले. उपचारादरम्यान बालकाच्या आतड्यांवर सूज आणि संसर्गाची समस्या उद्भवली. मात्र, आर.पी. हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांनी अत्याधुनिक वैद्यकीय पद्धती आणि उच्च प्रतीच्या औषधांचा वापर करून या आव्हानांवर यशस्वीपणे मात केली. याबद्दल हॉस्पिटलचे प्रमुख आ.डॉ.राहुल पाटील यांनी डॉक्टरांचे अभिनंदन केले असून कुटुंबाने देखील आ.पाटील यांचे आभार मानले आहेत.

डॉ. गायकवाड म्हणाले, '' ही नवजात बालकांमधील गंभीर अवस्था आहे, विशेषतः कमी वजनाच्या अकाली जन्मलेल्या बालकांमध्ये. या बालकाचे वजन केवळ १००० ग्रॅम होते आणि त्याला व्हेंटिलेटरसह सतत देखरेखीची गरज होती. आमच्या चमूने अत्यंत काळजीपूर्वक आणि समर्पितपणे उपचार केले.

बालकाचे वडील भावूक होत म्हणाले, ''आमची आर्थिक परिस्थिती अत्यंत कमकुवत आहे. आमच्या मुलावर उपचार करणे आम्हाला परवडणार नाही, असे वाटले होते. पण आ.डॉ. पाटील यांच्या आर. पी. हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी आणि स्टाफने आम्हाला आधार दिला. त्यांनी आमच्या मुलाला आपल्या कुटुंबाचा हिस्सा मानून उपचार केले. आज आमचा मुलगा सुखरूप घरी परतला, याचे श्रेय आम्ही हॉस्पिटलच्या डॉक्टर आणि स्टाफला देतो.'' बालकाच्या आईने आनंदाश्रूंनी सांगितले, ''माझ्या मुलाला नवजीवन मिळाले, यापेक्षा मोठा आनंद माझ्यासाठी नाही.''





## वनामकृविच्या कृषि महाविद्यालयातील एनसीसी युनिटला ग्रुप कमांडर ब्रिगेडियर अनुप बरबरे व कर्नल दिलीप रेड्डी यांची भेट

**परभणी,/प्रतिनिधी-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या कृषि महाविद्यालयातील एनसीसी युनिटला ग्रुप कमांडर ब्रिगेडियर श्री. अनुप बरबरे व कमांडिंग ऑफिसर कर्नल श्री. दिलीप रेड्डी यांनी दिनांक २ सप्टेंबर रोजी भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी सर्वप्रथम महाविद्यालयातील एनसीसी कार्यालयाची पाहणी करून उत्कृष्ट व्यवस्थापन, स्वच्छता व शिस्तबद्ध कामकाज याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच या कार्यालयाला ''बटालियनमधील सर्वोत्तम कार्यालय'' म्हणून गौरविले.

दौऱ्यादरम्यान ब्रिगेडियर श्री. अनुप बरबरे व कर्नल श्री. दिलीप रेड्डी यांनी माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांची औपचारिक भेट घेतली. या वेळी विविध शैक्षणिक, सामाजिक व व्यक्तिमत्व विकासाशी संबंधित उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा झाली. यानंतर त्यांनी एनसीसी कॅडेट्सशी संवाद साधत नेतृत्वगुणांचे महत्त्व स्पष्ट केले. कॅडेट्सना समाजसेवा, राष्ट्रसेवा व शिस्तीचे महत्त्व पटवून देत भविष्यात जबाबदारीची जाणीव ठेवून कार्य करण्याचे मार्गदर्शन केले. या प्रसंगी शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, कुलसचिव श्री संतोष वेणीकर, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रविण वैद्य, विभागप्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे, कृषि महाविद्यालयाचे छात्रसेना अधिकारी लेफ्टनंट जयकुमार देशमुख तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# स्व. जिजाभाऊ धोंडीराम गिराम यांची पुण्यतिथी वाचनालयास पुस्तके भेट

**परभणी ,/प्रतिनिधी:** जि. प. आदर्श शाळा लोणी बु. येथे स्वर्गीय जिजाभाऊ धोंडीराम गिराम यांचे द्वितीय पुण्यस्मरण पुण्यतिथी निमित्त श्री रणजीत नाना गिराम यांनी जेवण्या-खाण्यावर अवास्तव खर्च न करता शाळेच्या वाचनालयास १५००० ₹ ची ३५० पुस्तके भेट देऊन एका आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी करून समाजापुढे, गावापुढे एक आदर्श ठेवला.

समाजात चालू असलेल्या रुढी, प्रथा, परंपरा याला बगल देऊन एक आगळावेगळा कार्यक्रम साजरा केला. अशा कार्यक्रमामुळे समाजामध्ये सकारात्मक बदल घडण्यास सुरुवात होईल. पुस्तकामुळे विद्यार्थ्यांना आयुष्यभराची शिदोरी मिळली. या कार्यक्रमामुळेगावातीललोकांना प्रेरणा मिळेल व इथून पुढे असे कार्यक्रम गावात घडतील अशी अपेक्षा व्यक्त करून शाळेचे मुख्याध्यापक श्री चिंचाने सर यांनी श्री. गिराम साहेबांचे व त्यांच्या कुटुंबीयांचे मनःपूर्वक आभार मानले. या पुस्तकाचा वापर करून आम्ही आपल्या गावातील विद्यार्थी गुणवान व ज्ञानवंत बनवू असा उपस्थित मान्यवरांना शब्द दिला. पोलीस निरीक्षक श्री लांडगे साहेब यांनी वाचनामुळे माणसाचे मस्तक सुधारते आणि तो दुसऱ्याचा गुलाम होत नाही. सृजनशील व वैचारिक बनतो, चांगले वाईट याची जाणीव होते, म्हणून मुलांनी जास्तीत जास्त पुस्तकाचे



वाचन करावे व चौकस बनावे. कारण वाचनामुळे माणसाच्या आयुष्यात बदल घडतो कारण मी घडलो तो केवळ वाचनामुळेच असे मत व्यक्त केले. तसेच त्यांनी शालेय परिसर व शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता बघून समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी श्री. रवींद्र रामकिशन धर्मे (शिवसेना जिल्हाप्रमुख परभणी), पोलीस निरीक्षक पाथरी श्री महेश लांडगे साहेब, श्री रंजीत नाना गिराम (माजी जि प सदस्य परभणी तथा पोलीस पाटील लोणी बु) श्री साहेबराव धर्मे ( माजी चेअरमन), श्री रामकिशन अण्णा धर्मे, श्रीराम सूर्यवंशी श्री श्री बाळासाहेब मायकर श्री.दत्ता गिराम, तसेच शा व्य. समिती अध्यक्ष श्री दत्तराव जाधव शाळेचे मुख्याध्यापक श्री चिंचाणे सर व गावातील इतर मान्यवर, तसेच शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सय्यद सर यांनी केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



छ-५सिडको छत्रपती संभाजीनगर येथील तांगडे परिवाराने जेष्ठा कनिष्ठा गौरीची स्थापना केली. महालक्ष्मी ची सजावट वृंदावन येथील राधारणी थीम प्रमाणे करण्यात आली असून दरवर्षी वेगवेगळे देखावे तयार करण्यात येतात. सजावटीचे वैशिष्ट्य म्हणजे सजावट पूर्णतः (हाताने) घरीच तयार केली जाते..

## सीआयआय-आयजीबीसी सिल्वर जयंती उत्सव



लाँच सेमिनारमध्ये डॉ. आर. चंद्रशेखर, माजी मुख्य आर्किटेक्ट, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार; श्री बी. थियागराजन, आयजीबीसी राष्ट्रीय अध्यक्ष व एमडी, ब्लूस्टार लिमिटेड.; श्री चित्रंजन कौशिक, सह-अध्यक्ष, आयजीबीसी नवी मुंबई चॅप्टर व सीओओ, इकोफर्स्ट सर्व्हिसेस; सुश्री वैशाली श्रीवास्तव, सीआयआयप्रादेशिक संचालक; आणि श्री आनंद मुथुकृष्णन, उप कार्यकारी संचालक, आयजीबीसी उपस्थित होते. सीआयआय चा भाग म्हणून आयजीबीसी ने मुंबईत आपली सिल्वर जयंती सुरू केली, जी भारताच्या ग्रीन बिल्डिंग चळवळीच्या २५ वर्षांचे प्रतीक आहे. आयजीबीसी ने सतत डिझाईन, हरित वास्तुकला आणि नेट-झीरो प्रॅक्टिसेससाठी आपली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली.

## गणेश घरी आणून कुटुंबासोबत गणेशचतुर्थीचा सण साजरा

छत्रपती संभाजीनगर : सध्या सोनी सबवरील 'उफ्फ ये लव है मुश्किल ...' मालिकेत कैरीच्या भूमिकेत लोकांचे मन जिंकणारी आशी सिंह पडद्याच्या मागे देखील तिच्या लाघवी स्वभावामुळे लोकप्रिय आहे. या वर्षी तिने पहिल्यांदाच बाप्पाची मूर्ती बसवून आपल्या कुटुंबासोबत हा सण साजरा केला.आशीने शेअर केले आहे की, हा सण तिच्या कुटुंबाचा किती आवडीचा सण आहे. यावर्षी त्यांच्या कुटुंबात विशेष उत्साह होता, कारण पहिल्यांदाच त्यांनी बाल गणेशाची मूर्ती घरी आणली. आशी आणि तिच्या भावंडांनी सगळी जबाबदारी वाटून घेतली होती. कुणी सजावटीची जबाबदारी घेतली, तर कुणी मोदक केले. आशीने आरतीची प्लेलिस्ट तयार केली. बाप्पाचे स्थान सुशोभित करण्याचे काम देखील तिने केले आणि सजावट या सणाच्या उत्साहाला साजेशी असेल पण त्यास वैयक्तिक स्पर्श असेल, याची काळजी तिने घेतली. पहिल्या दिवशी नैवेद्यासाठी तिने आपल्या आईला स्वयंपाकात मदत केली. अशाप्रकारे सगळ्या कुटुंबाने मिळून तयारी केली आणि कामाच्या स्थळीचे मित्र-मैत्रिणी देखील या आनंदोत्सवात सहभागी झाले.

## डोरेमॉनचा वाढदिवस साजरा

मुंबई : यंदा सप्टेंबरमध्ये भारतातील डिस्नी चॅनेल चॅनेलवरील सर्वात लोकप्रिय पात्र डोरेमॉनसाठी उत्साहपूर्ण साजरीकरण करत आहे. ३ सप्टेंबर रोजी डोरेमॉनचा वाढदिवस साजरा करण्यासह चाहते १ सप्टेंबरपासून आठवडाभर सुरू होणाऱ्या सेलिब्रेशनचा आनंद घेऊ शकतात, ज्यामध्ये खास कार्यक्रम, परस्परसंवादी डिजिटल कार्यक्रम आणि चाहत्यांवर केंद्रित उपक्रमांचा समावेश आहे, जे या वाढदिवसाला संस्मरणीय करण्याची खात्री देतात.

## जेबीएलनेसणासुदीचा उत्साह वाढवला

मुंबई : भारतात बहुप्रतिक्षित सणासुदीचा हंगाम सुरू होत असताना, जेबीएल इंडियाने आपली ३६०-डिग्री मार्केटिंग मोहीम - साउंड ऑफ सेलिब्रेशन्स सादर केली आहे. या मोहिमेत प्रादेशिक संगीताचा आनंद साजरा करणारे एक खास गाणे आणि दमदार नवीन उत्पादनांची श्रेणी सादर केली आहे, ज्यात जेबीएल पार्टीबॉक्स एन्कोर २, पार्टीबॉक्स एन्कोर इसेन्शियल २, पार्टीबॉक्स ५२०, चार्ज ६, फ्लिप ७, आणि जेबीएल बार १३०० यांचा समावेश आहे. ही उत्पादने रिटेल, डिजिटल आणि सांस्कृतिक स्तरांवर आवाज, भावना आणि नवनिर्मिती यांचे मिश्रण घडवून आणतात.

## सर्वात मोठा टेलिव्हिजन सादर करत वॉबल डिस्प्ले

छत्रपती संभाजीनगर - इंडकाल टेक्नॉलॉजीज ब्रॅन्डचा अंतर्गत तंत्रज्ञान विभाग असलेल्या वॉबल डिस्प्लेजनेआज मॅक्सिमस सीरीज ११६.५ इंच गुगल टीव्ही ५.० च्या लाँचची घोषणा केली आणि भारताच्यआजवरच्या सर्वात मोठ्या ग्राहक टेलिव्हिजनच्या इतिहासात एक नवीन उच्चांक प्रस्थापितकेला. तंत्रज्ञानाचा हा चमत्कार, इतर ब्रॅन्ड्सपेक्षा खरोखरचउच्च दर्जाचा (शब्दशः) आहे आणि वॉबल डिस्प्लेजचे डिस्प्ले तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातीलसंशोधन व नवोन्मेष यातील सामर्थ्य प्रदर्शित करतो पूर्णत:आंतरराष्ट्रीय ब्रॅन्ड्सचे वर्चस्व असणाऱ्या या क्षेत्रात, एका भारतीय कंपनीसाठी हाएक अनन्य विक्रम आहे.

## युवाच्या 'माय बाप्पा वर्कशॉप'मुळे विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित

छत्रपती संभाजीनगर : गणेशोत्सवाच्या मंगलप्रसंगी नवनीत एज्युकेशन लिमिटेडच्या 'युवा' या स्टेशनरी विभागाने विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय असलेल्या 'माय बाप्पा वर्कशॉप'चे देशभरातील ८०हून अधिक शाळांमध्ये आयोजन केले. या विधायक उपक्रमात 'युवा'ने खास तयार केलेल्या किट्सच्या साहाय्याने विद्यार्थ्यांनी अनोख्या कलाकृती साकारत परंपरा आणि संस्कृतीला सर्जनशीलतेची जोड देत गणेशभक्तीचा उत्सव साजरा केला.'युवा'तर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या 'माय बाप्पा वर्कशॉप'या वार्षिक कार्यशाळेच्या माध्यमातून गणेशोत्सवाचा उत्साह सर्जनशीलता आणि शिक्षणाच्या माध्यमातून जिवंत होतो. गणेशोत्सव हा 'युवा'साठी केवळ सण नसून कल्पनाशक्ती, ज्ञान आणि एकत्रित आनंदाचा उत्सव आहे आणि मुले या आनंदसोहळ्याचा केंद्रबिंदू असतात.

## प्रत्येक घरात एक कथा दडलेली असते

प्रत्येक घरात एक कथा दडलेली असते - काही साजऱ्या होतात, तर अनेकदा काही न सांगितलेल्या राहतात. आपल्या नवीन 'आपका अपना झी' या ओळखीसह झी टीव्ही घेऊन येत आहे 'कहानी हर घर की' - एक हृदयस्पर्शी नॉन-फिक्शन मालिका, जी भारतीय महिलांना त्यांच्या मनात वर्षानुवर्षं दडवून ठेवलेल्या सत्यांना व्यक्त करण्यासाठी सुरक्षित आणि आधार देणारी जागा देते. भावनिक उपेक्षा, सामाजिक दबाव, वैवाहिक संघर्ष किंवा वैयक्तिक त्याग असो - हा शो प्रामाणिक

# मराठा आरक्षणाच्या निर्णयाचे शहर भाजपा कडून जल्लोषात स्वागत

छत्रपती संभाजीनगर - शहर भाजपतर्फे आज (३ सप्टेंबर २०२५) क्रांती चौकातील शिवाजी महाराज पुतळा परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडविल्याबद्दल भव्य जल्लोष साजरा करण्यात आला.

भाजपा शहर जिल्हाध्यक्ष किशोर दादा शितोळे यांच्या उपस्थितीत, ढोल-ताशांच्या गजरात व पेढे वाटून आनंदोत्सव पार पडला. या वेळी भाजप कार्यकर्त्यांसह इतर पक्षांचे कार्यकर्ते, मराठा आरक्षण चळवळीतील कार्यकर्ते व ओबीसी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले.



जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे म्हणाले, आत्तापर्यंत अनेक मराठा मुख्यमंत्री झाले, पण मराठा समाजासाठी कायम सकारात्मक निर्णय केवळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच घेतले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला न्याय देत कालचा निर्णय अत्यंत कुशलतेने घेत, मराठा युवकांना विकासाच्या अधिक वाटा खुल्या केल्या आहेत.

यावेळी मराठा आरक्षण चळवळीतील उपस्थित कार्यकर्ते चंद्रकांत भराट, सुनील कोटकर, गणपत म्हस्के, मनोज गायके यांनि पेढे खाऊ घालून एकमेकांची गळाभेट घेतली, अभिनंदन केले. या जल्लोषास मंत्री मा. अतुल सावे, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवतजी कराड व आमदार संजय केणेकर यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमात शहर सरचिटणीस रामेश्वर भादवे, हर्षवर्धन कराड, ताराचंद गायकवाड, छाया खाजेकर, महिला मोर्चा अध्यक्षा डॉ. उज्वला दहिफळे, युवा मोर्चा अध्यक्ष राहुल दांडगे, अनुसूचित मोर्चा अध्यक्ष सचिन मिसाळ, तसेच राज गौरव वानखेडे, जालिंदर शेंडगे, लक्ष्मण शिंदे, संजय चौधरी, सागर पाले, शालिनी बुंदे, सविता कुलकर्णी, जयश्रीताई किवळेकर, माधुरी अद्वंत, मीना मिसाळ, अमृता पालोदकर, मनीषा मुंढे, सुनीता साळूंखे, विजया भोसले, सुवर्णा तुपे, दिव्या मराठे, दिव्या पाटील, आरती गुटलकर, सुनिता औरादे, लक्ष्मी गायकवाड, अश्विनी गायकवाड, शिवगंगा जायभाय आदींसह विविध आघाडी, प्रकोष्ठ पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आकांक्षा दलपत चव्हाण हिला विज्ञान मेळाव्यात द्वितीय क्रमांक; जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

तभा वृत्तसेवा

कन्नड -दि.०३ सप्टेंबर - पंचायत समिती शिक्षण विभागामार्फत आयोजित विज्ञान मेळाव्यात क्वांटम युगाची सुरुवात या विषयावर तालुकास्तरीय स्पर्धा सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयात पार पडली.

या मेळाव्यात तालुक्यातील जवळपास २५ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. यात श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर, शिवनगर (कन्नड)



येथील विद्यार्थिनी आकांक्षा दलपत चव्हाण हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. तिची जिल्हास्तरीय विज्ञान मेळाव्यासाठी निवड झाली आहे. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी डी. टी. शिंदे उपस्थित होते. पंच म्हणून विनायकराव पाटील कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. संतोष मतसागर, डॉ. युसूफ शेख व श्रीराम काळे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन संजय त्रिभुवन यांनी केले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष साबुसिंग राठोड, उपाध्यक्ष श्रामदास सुरडकर, सचिव पांडुरंग राठोड, सहसचिव संजय पुरी, कोषाध्यक्षा सरलाताई सोनवणे, संचालक शिवाजी वाघ, संचालक मुकुंद शिंदे, मुख्याध्यापक प्रकाश जिरेमाळी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आकांक्षा व तिच्या पालकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# प्रशांत शिंदे पदवीधर आघाडीचे जिल्हाध्यक्ष

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.०३ सप्टेंबर - भाजप पदवीधर आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी प्रशांत शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशाने तसेच मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे आणि प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर यांच्या मान्यतेने करण्यात आली असून, भाजप छत्रपती संभाजीनगर (पश्चिम) जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी याबाबतची अधिकृत घोषणा केली.

प्रशांत शिंदे हे विद्यार्थ्यांपासून शिक्षक चळवळीपर्यंत सक्रिय राहिले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना पदवीधर आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी संधी देण्यात आली आहे.



या निवडीनंतर शिंदे म्हणाले, ही निवड माझ्यासाठी सन्मानासोबतच मोठी जबाबदारी आहे. पदवीधर युवकांच्या प्रश्नांवर काम करत पक्षाची भूमिका स्पष्टपणे मांडण्यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे.

या निवडीबद्दल विविध क्षेत्रांतून शिंदे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. संजय गव्हाणे, माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर पवार, राज्य परिषद सदस्य उत्तमराव राठोड, उद्योजक मनोज पवार, जिल्हा सरचिटणीस सुभाष काळे, तालुकाध्यक्ष सुनील पवार, ललित सुराशे, गणेश घुगे, माजी उपसभापती काकासाहेब तायडे, सुनील निकम, राजेंद्र गव्हाणे, विष्णू राठोड, प्रशांत अग्रवाल, भगवान ठाकरे, विलास इंगळे, रामेश्वर मोरे, संतोष शिरसाट, कैलास जाधव, सुदाम पवार, श्रीराम जंजाळ, भक्तराज मुळे, गणेश चव्हाण, सौरभ कुलकर्णी, स्वप्निल जहागिरदार, विकास भारूका, अनिल शिरसाट, गणेश नागरे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# तालुकास्तरीय खो खो स्पर्धेत कै.बाबुरावजी काळे स्कूलचे संघ विजयी

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३ सप्टेंबर

शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळ संचालित कै.बाबुरावजी काळे स्कूलमध्ये तालुकास्तरीय खो खो स्पर्धा पार पडल्या. यात तालुक्यातून २५ संघांनी सहभाग नोंदवला.वय वर्षे १४ खालील आणि १७ ते १९ या गटातील स्पर्धा झाल्या. यात कै.बाबुरावजी काळे स्कूलचे



१४ वर्ष वयोगटातील मुले आणि मुली हे दोन्ही संघ विजयी झाले. विजयी सर्व विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा शिक्षक प्रा.संदीप निकम सरांचे,वर्गशिक्षकांचे शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा ज्योतीताई काळे,सचिव देवीना काळे - भटकर, संचालक शिवदीप काळे,ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश यादव,प्रा. कमलेश काळे,प्रा.डॉ. दादासाहेब पवार,प्रा.डॉ.नीलेश गाडेकर, प्रा.तडवी, प्रा.सुशील जावळे,मुख्याध्यापक निलेश पाटील,उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,पर्यवेक्षक सागर घाटे यांनी अभिनंदन केले

# श्री क्षेत्र बोडखा येथे गणेशोत्सव निमित्त भजन कार्यक्रम उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) - श्री क्षेत्र बोडखा येथील गणपती महोत्सवानिमित्त गावामध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री विठ्ठल भजनी मंडळ यांच्या वतीने भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या भजनसेवेत मंडळाच्या गायक-वादकांनी विविध अभंग, गवळणी व पारंपरिक भक्तिगीते सादर केली. परिसरातील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तिभावाने या कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रमात लहान मुलांनीही



सहभाग नोंदवून वातावरण अधिकच भक्तिमय केले.

कार्यक्रमाची सुरुवात श्रींच्या मंगलारतीने झाली, त्यानंतर विविध भक्तिरचना सादर करण्यात आल्या. संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने निनादला होता. कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी करण्यासाठी श्री विठ्ठल भजनी मंडळाचे सर्व सदस्य, ग्रामस्थ व स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

श्रींच्या कृपेने सर्व कार्यक्रम सुरळीत पार पडला असून, पुढील वर्षी अजून अधिक भक्तिभावाने कार्यक्रम साजरा करण्याचा निर्धार मंडळाने व्यक्त केला. यावेळी ह. भ .प. बाळकृष्ण महाराज लोंढे,सर्जेराव लोंढे, किसन जाधव , दिलीप लोंढे, गुलाब लोंढे, आकाश फाटे, वाल्मीक जेठे, उमेश फाटे ,योगेश राजगुरू, संताराम शिंदे अरुण खंबाट,राजेंद्र बनकर ,विश्वनाथ चव्हाण , एकनाथ जाधव, गुलाब नाके. आकेश फाटे आदींची उपस्थिती होती.

# मराठा आरक्षणाचा निर्णय होताच सोयगावात मराठा सेवकांकडून जल्लोष व विजयी मिरवणूक

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३ सप्टेंबर

मुंबईत आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला यश येऊन मराठा आरक्षणाचा निर्णय घेतल्याचे अध्यादेश मिळाल्याची माहिती मिळताच मंगळवारी सोयगावात रात्री सात वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात मराठा सेवकांकडून फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष करण्यात आला.यावेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर



यांच्या शहरातील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून भवानी मातेचे पूजन करून विजयी मिरवणूक काढण्यात आली.दरम्यान विजयी मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौकात येऊन या ठिकाणी फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष केला.रात्री आठ वाजेपर्यंत जल्लोषाचा उत्साह शिगेला पोहचला होता.यावेळी तालुका समन्वयक विजय काळे,रविंद्र काळे,ड.योगेश पाटील, समाधान काळे,हर्षल काळे,संजय जाधव,भागवत थोटे, भगवान वारगणे, पुंडलिक मानकर,भागवत म्हस्के,आकाश वरकड,भागवत गायकवाड,भैय्या चौधरी,जितु चौधरी,भैय्या जुनघरे,अतिन परदेशी,विक्रम चौधरी,अमोल चौधरी,अतुल चौधरी,पुंडलीक मानकर,संदिप चौधरी,जयेश गाडेकर,पिनू पाटील आदींसह सर्व समाजातील नागरिकांनी मिरवणुकीत सहभाग घेतला व जल्लोष केला होता.

# जिल्हा सचिवपदी गणेश हजारी, खुलताबाद शहराध्यक्षपदी परसराम बारगळ. तालुका उपाध्यक्षपदी राजेंद्र बढे



खुलताबाद प्रतिनिधी /छत्रपती संभाजी नगर भारतीय जनता पार्टीच्या,जिल्हा सचिव गणेश हजारी खुलताबाद शहर, अध्यक्षपदी परसराम बारगळ .तालुका उपाध्यक्षपदी राजेंद्र बढे पाटील यांची निवड करण्यात आली आहे .

खुलताबाद येथील विश्रामगृहावर झालेल्या भाजपा कार्यकत्यांच्या बैठकीत तालुका अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांनी भाजपा तालुका कार्यकारणी जाहिर केली. गंगापुर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब, छत्रपती संभाजीनगर पश्चिम जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, यांच्या मार्गदर्शनाखाली, वरील निवड करण्यात आली. जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण माजी जि प उप अधक्ष, एल.जी. गायकवाड, माजी सभापती गणेश अधाने, दिनेश अंभोरे, ज्ञानेश्वर नलावडे, नवनाथ बारगळ, ज्ञानेश्वर बारगळ,योगेश बारगळ, दिनेश अंभोरे, सतिश दांडेकर सुखदेव ठेंगडे अरुण पाटे, रावसाहेब देशमुख, रमणलाल पंजाबी, संतोष ठेंगडे, यांनी अभिनंदन केले

# गायत्री कुलकर्णीचे सीए परीक्षेत यश



पैठण दि ०३ : तालुक्यातील घारी येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेली गायत्री अशोकराव कुलकर्णी हिने इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया(आईसीएआई) व कॉमन प्रोफीसीयंसी टेस्ट(सीपीटी) या सीए च्या दोन्ही परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण करून घवघवीत यश संपादन केले असून आज भारतातील नामांकित अपेक्स कंपनी मध्ये सनदी लेखापाल अधिकारी म्हणून बारा लाखाच्या पॅकेजवर तिची निवड करण्यात आली आहे.

पैठण तालुक्यातून वडवाळी येथील अरुण पाटील काळे यांची कन्या सुवर्णा काळे व घारी येथील अशोकराव कुलकर्णी यांची कन्या गायत्री कुलकर्णी या दोनच मुली सीए झाल्या आहेत.गायत्रीला सीए प्रसाद भंडारी, संदीप देसरडा,अमृत पटेल यांचे मार्गदर्शन लाभले. गायत्रीचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घारी येथे झाले असून उर्वरित शिक्षण भाऊसाहेब फिरोदिया एज्युकेशन सोसायटी अहील्यानगर येथे झाले आहे.गावकऱ्यातर्फे सीए गायत्रीचा सत्कार करण्यात आला,त्याचबरोबर गायत्री चे वडील अशोक कुलकर्णी,चुलते अनिल(संजय) कुलकर्णी,नागेश कुलकर्णी यांचा पण सत्कार करण्यात आला.

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर**

जा क्र २०२५/जमृअ/सीआर-३८१/कावि- दिनांक ०२/०९/२०२५

## जाहीर प्रगटन

अर्जदारः- आबेद अहेमद शहा

विरुध्द

गैरअर्जदारः उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, शासकीय वैधकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

विषयः- जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्ज संदर्भः श्री श्रीमती. आनंद अहेमद शहा, रा.चिस्तीया कॉलनी, सिडको एन-६. जि. छत्रपती संभाजीनगर

यांचा अर्ज दिनांक १३.०८.२०२५

विषयाकीत प्रकरणी अर्जदार यांनी ॲड. यांचेमार्फत या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे मुलगी नामे अनाबीया आवेद शहायांचा दिनांक ०४.०९.२०२२ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून जन्म नोंद जन्म नोंदवहीत घेण्यासाठो या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार यांचे मुलगी नामे अनाबीया आबेद शहा यांची जन्म नोंद नसल्याबाबत उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, शासकीय वैधकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहोर पगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे मुलगी नामे अनाबीया आवेद शहा यांचा जन्म दिनांक ०४.०९.२०२२ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे झाला असून अर्जदार यांचे मुलगी यांचे जन्म प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत/ तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/ हरकत/तक्रार मुळे कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परोसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करून लेखी स्वरुपात नोंदवावा, मुदतीनंतर आलेला उजर / आक्षेप / हरकत/तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे जन्म प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक ७/८/२०२५ रोजी देण्यात आले.

दिनांकः ०२/०९/२०२५ उप विभागीय अधिकारी,

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर. छत्रपती संभाजीनगर करीता

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर**

जा क्र २०२५/एम.ए.जी./सी आर-२४ दिनांक २/९/२०२५

## जाहीर प्रगटन

अर्जदारः कदीर हमीद शेख

विरुध्द

गैरअर्जदारः ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय सहजापुर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर

विषयः- जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्ज

संदर्भः- श्री/श्रीमती. कदीर हमीद शेख, रा. सहजापुर, ता.जि. छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज दिनांक ०३.०१.२०२५

विषयाकीत प्रकरणी अर्जदार यांनी ॲड. यांचेमार्फत या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे मुलगी नामे उम्मेहानी कदीर शेख यांचा दिनांक ०१.०४.२०१९ रोजी राहते घरी, मौ. सहजापुर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून जन्म नोंद जन्म नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार यांचे मुलगी नामे उम्मेहानी कदीर शेख यांची जन्म नोंद नसल्याबाबत ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय सहजापुर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे मुलगी नामे उम्मेहानी कदीर शेख यांचा जन्म दिनांक ०१.०४.२०१९ रोजी राहते घरी, मौ. सहजापुर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे झाला असून अर्जदार यांचे मुलगी यांचे जन्म प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत/ तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर / आक्षेप / हरकत / तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे जन्म प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक २/९/२०२५ रोजी देण्यात आले.

दिनांक ०२/०८/२०२५ उप विभागीय अधिकारी,

## अग्रलेख...

# ...तर जग अधिक लोकतांत्रिक होईल

**दुश्मनी जम कर करो लेकिन ये गुंजाइश रहे
जब कभी हम दोस्त हो तो शर्मिंदा न हो...**

बशीर बद्र यांच्या या शायरीतील 'गुंजाइश' शिल्लक होती म्हणून भारत व चीन 'दोस्ती'कडे वळले. अर्थात, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'टेरिफ' धोरणाचाच हा परिपाक आहे, हेही नाकारून चालणार नाही. शांघाय सहकार्य संघटनेच्या माध्यमातून चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमिर पुतिन आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आणखी जवळ आले आहेत. 'एससीओ'तील या तिघांचा परस्परांशी असलेला सहज आणि स्नेहपूर्ण वावर असेच काहीसे सांगत होता. अमेरिकेच्या दादागिरीला शह देण्यासाठी रशिया, चीन व भारत यांचा एक प्रभावशाली गट तयार होत असेल, तर ही आधुनिक जगाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना मानली पाहिजे. कारण आजवर जगाच्या राजकीय ध्रुवीकरणात अमेरिका कायम प्रबळ राष्ट्र म्हणून अग्रेसर राहिला आणि त्यामुळेच हा देश सातत्याने वर्चस्वाची भाषाही बोलू शकला. 'डॉलर'ला जगमान्य करू शकला. पहिले महायुद्ध असो की दुसरे, किंबहुना नंतरचे विविध राष्ट्रांतील शीतयुद्ध असो अमेरिका नेहमीच चोरावर मोर होण्याच्या भूमिकेत राहिला. नको तिथेही या राष्ट्राने नाक खुपसले. कारण नसताना पहेलगाम नंतरच्या भारत-पाकिस्तान संघर्षाला केवळ आपल्यामुळेच पूर्णविराम लागला, हे स्वतःच जाहीर करण्याची ट्रम्प यांना इतकी खुमखुमी होती की, एक नव्हे तर अनेकदा त्यांनी तीच ती 'री' ओढली. रशिया-युक्रेन संघर्षाचा तोडगाही स्वतःच ठरवून घेतला आणि तोंडघशी पडले. या साऱ्या प्रयत्नांत ट्रम्प यांना म्हणे नोबेलची आशा होती. जी आता धुळीस मिळाल्याची चिन्हे दिसत आहेत आणि त्यामुळे त्यांचा तिळपापड झाला आहे. त्यातूनच त्यांचे जागतिक 'टेरिफ' धोरण आलेले दिसते. काहीच विशेष कारण नसताना या धोरणाने भारताची फरफट झाली. स्वस्त मिळते म्हणून रशियाकडून तेल घेणे अमेरिकेला मुळीच भावले नाही आणि तब्बल ५० टक्के टेरिफ लावून त्यांनी भारतावर टेंभा मिरवण्याचा प्रयत्न केला. पण 'अमेरिका फर्स्ट'च्या त्यांच्या धोरणात इतरांच्या देशहितावर मर्यादा आणण्याचा अधिकार त्यांना कुणी दिला, हा प्रश्न विचारण्याची ताकद आता या 'एससीओ'च्या वार्षिक शिखर परिषदेतून भारतासारख्या देशाला मिळणार आहे. सोबतच ध्रुवीकरण संपवून जग अधिक लोकतांत्रिक होण्याच्या दिशेने वाटचाल करणार आहे.

पण त्याचवेळी पंचशील धोरणाचे गोडवे गाताना १९६२ चे चीनसोबतचे युद्ध, गलवान प्रकरणाचा इतिहासही आम्ही लक्षात ठेवला पाहिजे. ताकही फुंकून पिले पाहिजे. शी जिनपिंग यांनी नरेंद्र मोदी यांच्यासाठी लाल गालिचा अंथरला. दोन्ही देशांच्या भल्यासाठी हत्ती आणि ड्रॅगन यांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे वक्तव्य केले, हे चांगलेच. पण त्याचा उद्देश केवळ ट्रम्प यांच्यावर कुरघोडी करण्यापुरता राहू नये. कारण उद्देश बदलताच धोरणही बदलणे ही चीनची खासियत आहे आणि म्हणूनच चीन हा भारताचा शत्रू क्रमांक एक आहे, असे वक्तव्य भारताच्या संरक्षण मंत्र्यांनी केलेले आपण ऐकले होते.

मात्र, दुसरीकडे अमेरिकेनेही भारताविषयी काय वेगळे केले? एकेकाळी नरेंद्र मोदी हे माझे अत्यंत जवळचे मित्र आहेत, असे म्हणणाऱ्या ट्रम्प यांनी भारतावर चीनपेक्षाही जास्त टेरिफ लादून मैत्रीची बंधणे तोडलीच ना. त्यामुळे जागतिक पातळीवर कोणीही कुणाचा कायम मित्र किंवा शत्रू नसतो हे नजीकच्या अनेक घटनांवरून स्पष्ट होत आहे आणि म्हणून भारताला देशहिताच्या दृष्टीनेच निर्णय घेतले पाहिजेत आणि मोदी तेच करीत आहेत. त्यांचे संयमी निर्णय आणि ठाम पावले त्यांना जागतिक स्तरावर अधिक प्रतिष्ठा मिळवून देत आहे, हे मान्य केले पाहिजे.

'एससीओ'च्या बैठकीतून एक फरक मात्र नक्की जाणवला आणि तो म्हणजे, या संघटनेच्या घोषणापत्रातून पहलगाम हल्ल्याचा जाहीर निषेध नोंदवला गेला. जे युनोत घडले नाही, ते येथे घडले. तेही पाकिस्तानच्या उपस्थितीत घडले. चीनच्या घरात घडले आणि हा निश्चितच भारताचा मोठा विजय मानला पाहिजे. या बैठकीत पाकिस्तानचे अस्तित्व शून्यवत दिसले. परिषदेत वावरताना मोदी, पुतिन, जिनपिंग यांच्यातील अनौपचारिक चर्चेप्रसंगी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ हे एका कोपऱ्यात त्यांच्याकडे असहायपणे बघत असताना जगाने पाहिजे. त्याचवेळी या तिन्ही प्रभावी नेत्यांनी त्यांच्याकडे चक्क दुर्लक्ष केल्याचे छायाचित्र बाहेर आले. एका चित्रफितीत तर पुतिन आणि मोदी एकमेकांशी हास्यसंवाद करीत पुढे जात आहेत आणि तिकडे उभे असलेले शरीफ त्यांच्याकडे पडलेल्या चेहऱ्याने बघत आहेत, असेही दिसले. या साऱ्या प्रसारित घटनाक्रमांबाबत शरीफांच्या पाकिस्तानातच मोठी टीका झाल्याचे वृत्त आहे.

या साऱ्यात एका चित्रफितीने अवघ्या जगाचे लक्ष वेधून घेतले आणि ती म्हणजे, पुतिन यांनी दहा मिनिटे वाट पाहून मोदींना आपल्या गाडीत बसवले आणि दोघांची प्रदीर्घ अशी अनौपचारिक चर्चा खाजगीत रंगली. या घटनेचे चटके थेट अमेरिकेत जाणवले. लगेच ट्रम्प यांची त्यांच्या ट्रूथ सोशलवर एक पोस्ट पडली जी भारताविषयी पुन्हा एकदा आग ओकणारी ठरली. म्हणे, भारत आम्हाला भरपूर माल विकतो. पण आमच्याकडून फारशी खरेदी करीत नाही. तो तेल आणि शस्त्रांची खरेदीही रशियाकडून करतो. भारतासोबत व्यापार म्हणजे एकतर्फी आपत्ती आहे. व्वा ट्रम्प दा, तुम्हाला हे तुमच्या पहिल्या टर्ममध्ये नाही का आठवले?

भारताने याच 'एससीओ'च्या वार्षिक शिखर परिषदेत रशिया व युक्रेन यांच्यातील संघर्ष मिटावा म्हणून हव्या त्या सर्व प्रयत्नांचे समर्थन केले आणि लवकरच हे युद्ध संपेल अशी आशाही जाहीरपणे व्यक्त केली. रशिया तर भारताचा मित्र आहेच, पण युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की हेही भारताकडे आशेने बघत आहेत. त्यांचा आणि मोदी यांचा सुसंवाद आहे. असे असताना भारत अप्रत्यक्षपणे युक्रेनवरील हल्ल्यांसाठी मदत करीत आहे, ही उगाच गर्वभार वाहणारे ट्रम्प यांची मल्लिनाथी मोठी धक्कादायक आहे, स्वीकारार्ह तर मुळीच नाही. ट्रम्प यांचा पहिला कार्यकाळ भारतासाठी मैत्रीपूर्ण वाटत होता. पण दुसऱ्या कार्यकाळात त्यांनी पाकिस्तानमध्ये जास्त रस घ्यायला सुरुवात केली आहे. याने पाकिस्तानचे काळीज सुपाएवढे झाले असले तरी त्याचवेळी चीनने इस्लामाबादपासून स्वतःला वेगळे करायला सुरुवात केली आहे, ही त्यांच्यासाठी धोक्याची घंटा आहे. चीनच्या या पवित्र्याने पाकिस्तानचा ६१ हजार कोटींचा एक महत्त्वाचा प्रकल्प रखडला आहे. वारंवार कर्ज मागणाऱ्या, दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्या पाकिस्तानपेक्षा वेगाने प्रगती करणारा, मोठी बाजारपेठ असणारा भारतासारखा देश चीनला जास्त लाभदायक आहे, याची उपरती जिनपिंग यांना झाली असावी.

मात्र, या साऱ्यात रशियाकडे आपण विश्वासू मित्र म्हणून बघू शकतो. बांगलादेशच्या निर्मिती प्रक्रियेदरम्यानही अमेरिकेची भारताकडे वक्रदृष्टीच होती. तेव्हाही इंदिरा गांधी यांना रशियाने साथ दिली. 'एससीओ' परिषद मोदी आणि पुतिन यांच्या मैत्रीचीच साक्ष देत होती. हे खरे आहे, जेवढी भारताला रशियाची गरज आहे, तेवढीच निकड रशियालाही आहे. कारण पाश्चात्त्य, विशेषतः अमेरिकेने घातलेल्या निर्बंधांमुळे रशियन उत्पादनाला भारताखेरीज दुसरी मोठी बाजारपेठ उपलब्ध नाही. त्यामुळे रशिया आपल्यासाठी जास्त आश्वासक आहे.

**दुःख अडवायला उंबऱ्यासारखा
मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा...**

कवी आनंद राऊत म्हणतात तसे, रशिया असा मित्र होण्याची शक्यता थोडी जास्त असल्याने आणि अमेरिका विरोध म्हणून चीनही भारतासोबत येण्याची चिन्हे दिसत असल्याने ट्रम्पचे 'टेरिफ' आव्हान भारतासाठी थोडे सुकर निश्चित होईल, यात शंका नाही.

## विशेष

# ऊर्जा क्षेत्रात डिजिटायझेशन

प्रा. सुखदेव बखळे

आज जगभरात ऊर्जेची मागणी वाढत आहे. ऊर्जेच्या पुरवठ्यातील त्रुटी दूर करण्यावर, त्यात डिजिटलायझेशन आणण्यावर जगभरातील ऊर्जा वितरण कंपन्यांचा भर आहे. त्यातही आता ऊर्जेच्या निर्मितीतील संसाधनांना मर्यादा आल्याने जगभरात अक्षय ऊर्जा, हरित ऊर्जेचा वापर करण्याकडे कल वाढला आहे. जगभरात डाटा सेंटरचे महत्त्व वाढत आहे. त्यांना अखंडित विजेची गरज लागते. मुंबई, बंगळुरू, चेन्नई आणि दिल्लीसारख्या महानगरांमध्ये हायपरस्केल डेटा सेंटर असतात. हायपरस्केल डाटा सेंटर म्हणजे एखाद्या मोठ्या टेक कंपनीने बांधलेले आणि मालकीचे असलेले डेटा सेंटर. याला क्लाऊड डेटा सेंटर असेही म्हणतात. एका हायपरस्केल सुविधेत ५० हजार चौरस फूट किंवा त्याहून अधिक जागेत हजारो सर्व्हर असू शकतात. या सुविधा बहुतेकदा मोठ्या शहरांच्या बाहेरील भागात असतात.

पारंपरिक ग्रीड्सना, विशेषतः महानगरीय क्षेत्रांच्या पलीकडे डेटा सेंटर्सना लागणारी अखंड, उच्च-गुणवत्तेची वीज पुरवण्यात अनेकदा अडचणी येतात. लहान शहरे आणि ग्रामीण भागातील अनेक उदयोन्मुख डिजिटल हबना वारंवार वीज खंडित होणे, व्होल्टेज अस्थिरता आणि मर्यादित ग्रीड क्षमता यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे ट्रान्समिशन पायाभूत सुविधांवर अतिरिक्त दबाव येतो. महत्त्वाच्या डिजिटल सेवांसाठी अपटाईम राखण्यासाठी वीज पुरवठा, वितरण आणि लवचीकता धोरणांचा मूलभूत पुनर्विचार करणे आवश्यक आहे. भविष्यातील विकेंद्रित, बुद्धिमान ऊर्जा परिसंस्था या आव्हानांना तोंड देण्यासाठी या क्षेत्राने स्वयंपूर्ण ऊर्जा परिसंस्थांकडे वळले पाहिजे. यासाठी मायक्रोग्रीड्स, बॅटरी ऊर्जा साठवण प्रणालींद्वारे वाढवलेल्या अक्षय ऊर्जा आणि रिअल-टाईम ऊर्जा ऑप्टिमायझेशन तंत्रांसह हायब्रीड ऊर्जा स्रोतांचे एकत्रीकरण आवश्यक आहे. विकेंद्रित वीज वितरण संरचना अस्थिर ग्रीड्सवरील अवलंबित्व कमी करतात. त्यामुळे ग्रामीण डेटा नोड्स, टेलिकॉम टॉवर्स आणि स्मार्ट कारखाने यासारख्या प्रमुख संस्थांना उच्च गुणवत्तेसह स्वायत्तपणे ऑपरेट करता येते. पायाभूत सुविधांचे निरीक्षण आणि 'एआय' संचलित ऊर्जा व्यवस्थापन भार वितरण आणि भविष्यसूचक देखभाल सुधारू शकते. परस्परांशी जोडलेल्या डिजिटल साईट्सची ऊर्जा कार्यक्षमता वाढवू शकते.



२०३० पर्यंत ५०० गीगावॅट अक्षय क्षमता साध्य करण्याचे भारताचे महत्त्वाकांक्षी अक्षय ऊर्जा लक्ष्य आहे. सरकारी प्रोत्साहनांमुळे डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये हरित ऊर्जेचे एकत्रीकरण वेगाने होत आहे. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी ऑपरेटर रूफटॉप सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि प्रगत शीतकरण तंत्रज्ञानाचा वापर वाढवत आहेत. उल्लेखनीय म्हणजे केंद्र सरकारने दिलेल्या प्रोत्साहन अनुदानांमुळे ऊर्जा साठवण उपक्रमांनी बॅटरी स्टोरेजचा अवलंब करण्यास गती दिली आहे. ती पुरवठा-मागणी तफावत भरून काढण्यासाठी आणि अक्षय ऊर्जेची अनियमित उपलब्धता कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. धोरणात्मक उपक्रम गुंतवणूक आणि प्रगत उपाय धोरण पायाभूत सुविधा निश्चित करतात. गुंतवणूकदार आणि ऑपरेटर भारतातील अत्यंत पर्यावरणीय परिस्थितीत कार्य करण्यास सक्षम असलेल्या मॉड्यूलर, स्केलेबल पॉवर युनिट्ससह पायाभूत सुविधांचा विस्तार करत आहेत. उच्च-कार्यक्षमता अखंड वीजपुरवठा, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)-आधारित देखरेख प्लॅटफॉर्म आणि हायब्रीड ग्रीड-स्टोरेज संयोजन यासारख्या तंत्रज्ञानामुळे सातत्यपूर्ण वीज गुणवत्ता आणि लवचीकता सुनिश्चित होते. या प्रगतींमध्ये ऑपरेशनल लवचीकतादेखील समाविष्ट आहे. त्यामुळे डेटा सेंटर्सना मागणी आणि पुरवठ्यातील चढ-उतारांनुसार विजेची गरज समायोजित करता येते. त्यामुळे एकूण खर्च आणि शाश्वततेचा धोका कमी होतो.

भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या आणि ऊर्जा पायाभूत सुविधांच्या सहजीवन वाढीमुळे जटिल आव्हाने निर्माण होतात. त्यासाठी नावीन्यपूर्ण आणि एकात्मिक दृष्टिकोनाची आवश्यकता असते. सक्रिय गुंतवणूक आणि सक्षम धोरणांद्वारे डेटा सेंटर्सच्या उदयोन्मुख गरजांनुसार तयार केलेल्या विकेंद्रित, बुद्धिमान आणि हरित ऊर्जा प्रणालींचा विकास अत्यंत महत्त्वाचा असेल. अक्षय ऊर्जा ही अनंत शक्ती आहे. पृथ्वीवर पारंपरिक ऊर्जेचे स्रोत अतिशय मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत या पारंपारिक ऊर्जेचे स्रोत मोठ्या प्रमाणात वापरले गेल्यास हे पारंपरिक स्रोत संपुष्टात आल्यावर एक गंभीर समस्या उद्भवेल. म्हणूनच जगभरात अपारंपरिक ऊर्जा स्रोतांना प्रोत्साहन देण्याची गरज भासू लागली आहे. अक्षय ऊर्जा स्रोतांपासून ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. अक्षय म्हणजे जी कधीही संपत नाही अशी. म्हणजेच अक्षय ऊर्जा ही प्रत्यक्षात ऊर्जेचा अमर्याद पर्याय आहे आणि आजच्या काळात कोणत्याही राष्ट्राच्या अक्षय विकासाचा मुख्य आधारस्तंभ देखील आहे. पर्यावरणीय चिंता लक्षात घेता, गेल्या काही वर्षांपासून अशी ऊर्जा आणि तंत्रज्ञान विकसित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे जागतिक तापमानवाढीच्या वाढत्या समस्येपासून जगाला काही प्रमाणात दिलासा मिळू शकेल.

घरगुती आणि कृषी क्षेत्रांव्यतिरिक्त औद्योगिक क्षेत्रात विशेषतः वीज आणि इंधनाच्या स्वरूपात वापरल्या जाणाऱ्या ऊर्जेची मागणी सतत वाढत आहे. वीज आणि पेट्रोलियमसारख्या महत्त्वाच्या ऊर्जेच्या सुमारे ५५ टक्के स्रोतांचा वापर केवळ औद्योगिक क्षेत्रात केला जातो. ज्या विजेने आपण आपली घरे, दुकाने किंवा कार्यालये उजळवतो, ती वीज किंवा पेट्रोलियम आणि ऊर्जेचे इतर स्रोत देशाला विकासाच्या मार्गावर पुढे नेण्यासाठी वापरले जातात. आपल्याला ती वीज किंवा इतर ऊर्जेचे स्रोत किती मोठी किंमत देऊन मिळतात, याचा विचार कुणीच करत नाही. ही किंमत केवळ आर्थिकदृष्ट्याच नव्हे, तर पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून पाहताही खूप जास्त आहे. जगभरातील ऊर्जा क्षेत्रातील सुमारे ७५ टक्के कार्बन उत्सर्जन वीज उत्पादनातून होते, म्हणूनच आता सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जेसारख्या अक्षय ऊर्जा स्रोतांना विशेष महत्त्व दिले जात आहे. आता भारतात 'ग्रीन हायड्रोजन मिशन', 'स्मार्ट ग्रीड', 'बॅटरी स्टोरेज' आणि 'इलेक्ट्रिक मोबिलिटी'सारखी पावलेदेखील वेगाने पडत आहेत. त्यामुळे अक्षय ऊर्जा व्यावहारिक आणि शाश्वत होईल. ग्रीन हायड्रोजन मिशनअंतर्गत २०३० पर्यंत पाच दशलक्ष टन उत्पादन करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे, जेणेकरून भारत केवळ त्याच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करणार नाही, तर निर्यात करणारा देश बनेल. खऱ्या अर्थाने पाहता, आज भारतात विविध स्वरूपातील ऊर्जेच्या गरजांसाठी अक्षय ऊर्जा हा मुख्य पर्याय आहे, जो पर्यावरणपूरक तसेच शाश्वत आहे. भारत हळूहळू या दिशेने वाटचाल करत आहे. आज आपण आर्थिक संकट आणि प्रचंड पर्यावरणीय विनाशाच्या किमतीवर थर्मल, हायड्रो आणि अणुऊर्जा यासारख्या पारंपरिक ऊर्जा स्रोतांवर अवलंबून राहत आहोत. त्याऐवजी तुलनेने अतिशय स्वस्त आणि कार्बनमुक्त पर्यावरणपूरक ऊर्जास्रोतांच्या विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करण्याची वेळ आली आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

हेमंत सालोडकर

# एक तास स्वच्छतेची आस

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी आपल्या पहिल्याच कारकीर्दीच्या सुरुवातीला राजधानी दिल्लीतून स्वच्छ भारत अभियान सुरू केले. आधी केले मग सांगितले हे तत्त्व आचरणात आणत त्यांनी स्वतः स्वच्छतेची सुरुवात केली आणि इतरांनीही ती अंगी बाणावी यासाठी जनतेला प्रेरित केले. त्यांच्या आवाहनाला लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्यावेळी भारताच्या ४,००० हून अधिक शहरांच्या, रस्त्यांच्या व भारतातील विविध नद्यांच्या स्वच्छतेसाठी केंद्र सरकारने हे अभियान सुरू केले आणि त्यानंतर त्याला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. महात्मा गांधींच्या शिकवणीला अनुसरून हे अभियान पंतप्रधानांनी सुरू केले. त्यांनी स्वतः रस्ते स्वच्छ केले. तेव्हा मोदी म्हणाले, महात्मा गांधींना खरी श्रद्धांजली म्हणजे २०१९ मध्ये त्यांच्या १५० व्या जयंतीला त्यांची स्वच्छ भारताची इच्छा साध्य करणे होय. हे भारताच्या स्वच्छतेसाठी सर्वांत मोठे अभियान आहे. यात ३० लाखाहून अधिक सरकारी कर्मचारी, शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आणि सर्वसामान्य लोकांनी भाग घेतला. विशेष म्हणजे स्वच्छ भारत अभियान ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागांत मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) हे पेयजल व स्वछता मंत्रालयांमार्फत व स्वच्छ भारत अभियान (शहरी) हे शहर विकास मंत्रालयमार्फत राबविण्यात आले. २ ऑक्टोबर २०१४ला ग्रामीण भागासाठी निर्मल भारत अभियानाची पुर्नरचना करून स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) सुरू करण्यात आले, तर शहरी भागात ते संपूर्णपणे नव्याने सुरू करण्यात आले.

२०११ च्या जनगणनेनुसार ग्रामीण भागातील ३२.७० टक्के ग्रामीण कुटुंबांनाच शौचालयाची सुविधा होती, तर २०१३ एका सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील ४०.६ टक्के ग्रामीण कुटुंबांनाच ही सुविधा होती. स्वच्छ भारत अभियानाने स्वच्छ भारत साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. यासाठी ग्रामीण भागातील स्वच्छतेच्या पातळीत सुधारणा करणे व गावे हागणदारीमुक्त करणे हे साधारण उद्दिष्ट होते. यासाठी ग्रामीण भागात वैयक्तिक शौचालये , सार्वजनिक स्वच्छतागृहे, शाळा व अंगणवाड्यांमध्ये शौचालये, घन व द्रव कचरा व्यवस्थापन यंत्रणा उभारून कार्यक्रमाच्या प्रभावी अंलबजावणीवर भर देण्यात आला. याला जोड म्हणून जनजागृती करणे, ठिकठिकाणी चर्चासत्रे आयोजिण्यात आली. यात विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच स्वच्छतेची सवय लागावी म्हणून शाळा, महाविद्यालयांना कार्यक्रमासाठी प्रेरित करण्यात आले. स्वच्छ भारत अभियानाचा उद्देश देशभरात स्वच्छतेला प्रोत्साहन देणे आहे. स्वच्छ भारत अभियानाची प्राथमिक उद्दिष्टे म्हणजे उघड्यावर शौच करणे बंद करणे, शौचालये बांधणे, घनकचरा व्यवस्थापन करणे आणि नागरिकांमध्ये स्वच्छता पद्धतींबाबत वर्तणुकीत बदल आणणे हे होय. या अभियानाने लोकचळवळीचे स्वरूप धारण केले. सरकारी संस्था, स्वयंसेवी संस्था, खाजगी संस्था आणि नागरिकांसह समाजाच्या विविध क्षेत्रांकडून या मोहिमेला लक्षणीय लक्ष आणि सहभाग मिळाला. या अभियानाची व्याप्ती आणि यश पाहता ते तळागाळात रुजले असले तरी काही ठिकाणी अजूनही अस्वच्छता पसरवणाऱ्या लोकांची कमतरता नाही. वाटेल तेथे घाण करणे, सार्वजनिक ठिकाण म्हणजे आपली मालमत्ता असल्यासारखे वागणे, उघड्यावर अन्नपदार्थ टाकणे यासारख्या सवयी अंगी असलेल्या लोकांना शिस्त लावणे कठीणच आहे. अशा लोकांवर दंडाचा बडगा उगारला तरच ते ताळ्यावर येतील. स्वच्छतेसोबतच काही सार्वजनिक नियम पाळावे लागतात याचेही भान नागरिकांना नसते. वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन ही तर आपली मक्तेदारी असल्यासारखे त्यांचे वागणे असते. प्रत्येकच ठिकाणी पोलिस उभे राहणार नाही. त्यांचे काम ट्रॅफिक सिग्नल करतात. मग हे नियम तोडून भरधाव वाहन दामटण्याचा ठेका जणू आपल्याकडेच आहे, अशी मुजोर वाहनचालकांची भूमिका असते. स्वच्छतेचा संस्कार अंगी रुजण्यासाठी ठिकठिकाणी अनेक उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमात आघाडीवर होते सफाई कामगार. त्यांनी लोकांमध्ये स्वच्छतेबाबत जागृती केली. अशाच उपक्रमात नागपूर महानगर पालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून स्वच्छ, सुंदर, स्वस्थ नागपूर साकारण्यासाठी महिन्याच्या पहिल्याच दिवशी मनपा व नागपूर स्मार्ट सिटीच्या संयुक्त वतीने व घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे 'एक तारीख, एक तास, एक साथ' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. मनपाच्या दहाही झोनमध्ये या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. सोबतच पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासह पावसाळ्याच्या दृष्टीने काय खबरदारी घ्यावी याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. सार्वजनिक ठिकाणे अस्वच्छ राहणार नाहीत याबाबत काळजी घेण्यासंदर्भात जनजागृती करण्यात आली. एकूणच नागपूर मनपाच्या या उपक्रमाने इतर महानगरपालिकांनी प्रेरणा घेऊन प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला, एक तास, एक साथ स्वच्छता अभियान राबविले तरी शहरे स्वच्छ होण्यास गती मिळेल.

९८५०७५३२८१

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता- ज्ञान-विज्ञान योग

प्रा. दिलीप जोशी

श्रीमद्भगवदगीतेच्या सातव्या अध्यायाला ज्ञान-विज्ञान योग नावाने संबोधितात. या अध्यायात भगवंत जीवांच्या कल्याणासाठी सहज आणि सोपी मांडणी करतात असे माझे मत आहे. आधीच्या सहा अध्यायांत आपण कर्म, निष्काम कर्म ,कर्मयोग तसेच संयम, विवेक, त्याग, तपादी कर्मसंन्यास याबाबत अर्जुनाला भगवंतानी दिलेले मार्गदर्शन पाहिले. सातव्या अध्यायात भगवंतांनी ज्ञान-विज्ञानावर मार्गदर्शन करून त्या परमात्म्याशी थेट संबंध प्रस्थापित करण्याचा मार्ग सांगितला म्हणून हा कुतूहल आणि उत्सुकतेचा विषय आहे.

ज्ञान म्हटले की आपण उथळ माणसे नॉलेज माहिती या अर्थानी वापरतो. विज्ञान म्हणजेच विशेष ज्ञान म्हणून व्याख्या करतो. भगवंत मात्र आपल्या बौद्धिकतेचे सर्व कप्पे उघडण्याचा मार्ग आपल्याला सांगतात. आपल्याला सहज समजेल असा या अध्यायाचा अर्कच सांगायचा असेल तर ज्ञान म्हणजे त्या परमसत्याचे बौद्धिक आकलन आणि विज्ञान म्हणजे त्या परम् सत्याची अनुभूती होय.

ज्ञान म्हणजे परम् सत्याचे बौद्धिक आकलन म्हणजे त्या ईश्वराला, देवाला जाणून घ्यायचे. तो कसा आहे? कुठे आहे? कसा भेटेल? तो भेटण्याचा मार्ग कोणता? याची माहिती घेणे. देवाला केवळ जाणून घेणे. मग ते जाणणे सद्गुरूमार्फत, ग्रंथादीतून किंवा अन्य कुठल्याही मार्गातून जाणून घेणे. हे मिळालेले आकलन म्हणजे ज्ञान.

ज्ञान ही विज्ञानाची पहिली पायरी आहे. विज्ञान म्हणजे काय? तर जाणून घेतलेल्या ईश्वराची अनुभवात्मक, हार्दिक अनुभूती. त्या परमपवित्र भगवंताचा दिव्य साक्षात्कार म्हणजे विज्ञान होय. ज्ञान जेव्हा कोणत्याही शंका न राहता निःसंशय बनते त्याला विज्ञान म्हणतात. साखर गोड आहे हे ज्ञान आणि प्रत्यक्षात जिभेवर ठेवून अनुभूती घेणे हे विज्ञान. पोहायचे कसे याची केवळ माहिती घेणे हे ज्ञान. प्रत्यक्ष तलावात उतरून पोहणे हे विज्ञान. देव चराचरात आहे ही माहिती म्हणजे ज्ञान. त्यानुसार आचरण करून तो चराचरात असण्याची जाणीव जागृत करून वागणे आणि अनुभूती घेणे म्हणजे विज्ञान. या अध्यायात भगवंतांनी आपले रूप कसे आहे ते सांगितले. त्या रूपाशी तादात्म्य आणि तन्मय होण्याचा मार्गही सांगितला. शास्त्रात त्याला परास्वरूप आणि अपरा स्वरूप म्हणतात. याला अरूपाचे रूप म्हणू शकतो.

हे जाणणे का महत्त्वाचे? तर भगवंत स्वतःच अर्जुनाला सांगतात.

**ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।**
**यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥**

हे अर्जुना, मी तुला विज्ञानासह हे ज्ञान सांगतो. जे जाणल्यानंतर जाणण्यासारखे काहीच राहत नाही. पण लक्षात ठेव! हे ज्ञान दुर्लभ आहे. हे ज्ञान प्राप्त व्हावे अशी बुद्धीच मनुष्याला होत नाही.

**मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।**
**यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥**

हजारो मनुष्यात एखादाच असतो की जो या ज्ञानप्राप्तीसाठी प्रयत्न करतो. त्यातही एखादाच निघतो की जो अनुभूती घेतो. म्हणजे हजारोत एखादाच ज्ञानमयी आणि त्यातही विरळाच विज्ञानमयी निघतो. यातून आपल्याला ज्ञान-विज्ञानी बनण्यासाठी किती कष्ट घ्यावे लागतील हे लक्षात घ्या.

अजून स्पष्ट करू. एखादा योगी तपस्वी कदाचित त्याला साक्षात्कारही झाला असेल तो फार फार तर विद्वान ऋषी म्हणजे ज्ञानी आहे. त्याला ज्ञानाकडून विज्ञानाकडे जायचे असेल तर त्याच्यातील भक्तिभाव जागरण आणि त्यानंतरची अनुभूती महत्त्वाची आहे. देव आणि भक्त दुजा नाही हा विचार महत्त्वाचा आहे. ज्ञानाकडून विज्ञानाकडे जाण्यासाठी भगवंतांनी स्वतःबद्दलचे ज्ञान म्हणजे भगवंताचे कनिष्ठ स्वरूप आणि वास्तव रूप सांगितले आहे.

कसे आहे भगवंताचे अपरा स्वरूप?

**भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।**
**अहङ्कार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥**

प्रथम त्यांनी पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू, आकाश, मन, बुद्धी, अहंकार या आठ विभक्त शक्ती (अष्टधा प्रकृती) असलेले भगवंताचे कनिष्ठ रूप सांगितले. ज्याला अपरा प्रकृती म्हणतात. त्यानंतर आत्मा हे उच्च स्वरूप असल्याचे भगवंताने स्पष्ट केले आहे. परमात्म स्वरूप म्हणजे जो विश्वरूपाने नटलेला असा. ज्याला परमेश्वराची परा प्रकृती होय.

तोच पाण्यातील रस, चंद्र सूर्याचा प्रकाश, वेदातील आदिबीज ॐ, आकाशातील शब्द, पृथ्वीतील गंध, अग्नीतील तेज आणि मनुष्यातील पौरुष तोच आहे. हे माझे माया रूप आहे. ते पार करायचे असेल तर अनन्यभावे शरणागतीच महत्त्वाची आहे. पण शरणागत जाण्याची बुद्धी इतकी सोपी नाही. कारण सर्व जण वाईट कर्मात प्रवृत्त आहेत, मायेने गुंतलेले आणि असुरी छायेत आहेत.

भगवंत स्वतः सांगतात की काही लोक माझी उपासना करतातही. पण विशिष्ट हेतूने.

त्यांचे चार प्रकार भगवंतांनी सांगितले.

**चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।**
**आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥**

१) आर्त म्हणजे दुःखी. २) जिज्ञासू म्हणजे ज्ञानाचा शोध घेणारे. ३) अर्थार्थी म्हणजे धनाचा शोध घेणारे. ४) ज्ञानी.

यातील ज्ञानी भक्त मला अत्यंत प्रिय आहे. कारण तोच पुढे विज्ञानी होईल आणि तोच पुढे युक्तात्मा बनून माझ्या स्वरूपामध्ये स्थिर होतो नव्हे आम्हाशीच साम्यरूप, समरस होईल.

**बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।**
**वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥**

जन्मजन्मांतरीच्या पुण्याईने ज्ञानी निर्माण होतो. तो सर्व विश्व वासुदेवस्वरूप पाहतो म्हणून असे भक्त दुर्मिळ आहेत.

थोडक्यात, भगवान या अध्यायात सांगतात की, त्या परम् सत्याचे आकलन म्हणजे ज्ञान आणि त्या सत्याची अनुभूती म्हणजे विज्ञान होय. ज्ञानप्राप्तीचे ठिकाण आणि साधन हे दोन्हीही आपले अंतःकरण आहे. ज्ञानी मात्र अखंड सावध राहून ज्ञान मिळवतात आणि अनुभूती घेत विज्ञानी होतात. भगवंताला अनन्यभावाने शरण जाऊन अंती आनंद स्वरूप होतात. जीवनभर आपण ज्याचा विचार करतो मृत्युशय्येवर देखील तेच मनात येत राहते. रात्रंदिवस जे केवळ संसाराचा विचार करतात त्यांना वृद्धावस्थेतही तेच आठवते.

**साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः ।**
**प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ॥**

जे अधिभूत,अधिदैव अधियज्ञासहित आयुष्यभर वावरतात, ते मृत्यूच्या समयी सुद्धा माझेच स्मरण करून मलाच जाणतात. इतरांनी कितीही प्रयत्न केला तरी अंतकाळी त्यांना परमात्म्याचे स्मरणही होत नाही. म्हणून आयुष्यभर हरिचिंतन महत्त्वाचे आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### एकाच परब्रह्माची सगुण रूपे

विष्णू, शिव, राम, कृष्ण ही सर्व दैवते एकाच परब्रह्माची सगुण रूपे आहेत आणि म्हणूनच कोणत्याही सगुण रूपाला शरण जाण्यासाठी प्रत्येक वेळी आरतीच्या शेवटी घालीन लोटांगण, वंदीन चरण मधुर नाद आणि लय असणारी ही वास्तविक पाच कडव्यांची संस्कृत व मराठी कडवी असणारी संत नामदेवांची ही रचना प्रार्थना स्वरूपात म्हटली जाते. त्वमेव माता पिता त्वमेव ही आद्य शंकराचार्यांची रचना; लीनत्व प्राप्त करून देते. श्रीमद्भागवत पुराणातील कायेन वाचा मनसेन्द्रियेर्वा ही रचना पूर्णपणे भगवान श्रीकृष्णाला अर्पित आहे. भक्त सगुण रूपातून निर्गुण रूपाकडे वळावा म्हणून अच्युतं केशवं रामनारायणं हा विश्व कल्याणासाठीच दुःख सागरातून बाहेर येण्यासाठीच शंकराचार्यांच्या अच्युताष्टकमधील पहिलाच श्लोक आहे. कलीसंतरण उपनिषदेमधील हरेराम हरेराम ही रचना सर्वदेवतांना विनम्र होऊन नमस्काररूपी प्रार्थनेचा समारोप आहे. वातावरण मंगल व प्रसन्न राहून पवित्र आनंदाचा अनुभव प्राप्त व्हावा, दुःख, चिंता, काळजी व आपापसातील मतभेद दूर व्हावेत व भक्ती आणि श्रद्धा या महासागराचे दर्शन व्हावे यासाठीच आरत्या संपल्यानंतर ही प्रार्थना केली जाते.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### प्रश्नांचा गोंधळ कधीपर्यंत?

यूपीएससीच्या धर्तीवर एमपीएससीची परीक्षा घेऊ असे एमपीएससीने घोषित केल्यानंतर त्याची अंमलबजावणी पुढे होणार असताना एमपीएससीचा गोंधळ काही कमी होताना दिसत नाही. नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या संयुक्त मुख्य परीक्षा २०२४ च्या उत्तरतालिकेत तब्बल १२ प्रश्न रद्द केल्याचे सांगितले सोबतच २ उत्तरांमध्ये बदल केल्याचे सांगितले म्हणजेच एकूण १४ प्रश्न व प्रत्येकी २ गुण म्हणजेच २८ गुणांचा फटका प्रामाणिक परीक्षार्थींना बसण्याचा धोका आहे. हा परीक्षार्थींवर होणारा मोठा अन्याय आहे. घडलेला प्रकार प्रचंड गंभीर व चीड आणणारा आहे. एमपीएससी स्वतंत्र संस्था असून त्यांच्याकडे तज्ज्ञांची काही कमी नाही. इतके तज्ज्ञ असून सुद्धा प्रश्न चुकतातच कसे? असा प्रश्न निर्माण झालेला आहे. असा गोंधळ वारंवार होत असल्याने विश्वासार्हतेच्या संदर्भात प्रश्न निर्माण होत आहे. ४७९ जागांसाठी ही भरती घेण्यात येत असून यासाठी तब्बल २ लाख ८६ हजार परीक्षार्थींनी पूर्व परीक्षेसाठी अर्ज केलेला होता त्यानंतर त्यातून ८ हजार १७९ परीक्षार्थींनी मुख्य परीक्षा दिली. अनेक परीक्षार्थी कित्येक वर्षे अभ्यास करून परीक्षेची तयारी करीत असतात त्यातही अशा ढिसाळ कारभारामुळे अनेकांमध्ये निराशा येते, त्यातही ही जाहिरात आठ महिने उशिरा आलेली. त्यातही असा चुकीच्या प्रश्नांचा गोंधळ. एमपीएससीने २०२५ पासून केंद्रीय लोकसेवा आयोगाची (यूपीएससी) परीक्षा पद्धती अवलंबण्याचा दावा केला आहे. तसेच २०२५ मध्ये होणारी राज्यसेवा परीक्षा ही यूपीएससीच्या परीक्षा पद्धतीप्रमाणे होणार आहे. मात्र, प्रत्यक्षात तसे बदल दिसत नाहीत. यूपीएससी पूर्व परीक्षेचा निकाल २० दिवसांत जाहीर करते, तर एमपीएससीच्या प्रक्रियेला दोन महिन्यांचा कालावधी लागतो. यामुळे मुख्य परीक्षेच्या तयारीवर परिणाम होतो. त्यामुळे आपण बरोबरी कोणत्या बाबतीत करू असा प्रश्न निर्माण झालेला आहे. नवीन पॅटर्न परीक्षार्थीकडून स्वीकारला जरी गेला तरी एमपीएससीकडून सुधारणा कधी होणार?. अचानक १०-१५ प्रश्न रद्द झाल्याने अनेक विद्यार्थी स्पर्धेतून बाहेर पडतात, ज्याचा त्यांच्या मनोबलावर प्रामाणिक मेहनतीवर विपरीत परिणाम होतो. यामुळे एमपीएससीच्या प्रक्रियेवर व मूल्यांकनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अशा गोंधळ कारभारामुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या परीक्षार्थींना विनाकारण नाहक त्रास सहन करावा लागतो आहे.

**वैभव बावनकर**/९५४५७४५५८०

### उचलली जीभ, लावली टाळूला

आपल्या देशात सध्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अतिरेक झाला असून त्याचा गैरफायदा घेणाऱ्यांमध्ये काही राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही आपल्या बाष्कळ वाणीने हातभार लावला आहे. मी मटण खाल्लेले पांडुरंगाला चालते आणि गळ्यात माळ घातल्यानंतर तर मटण खाण्याची इच्छा तीव्र होते असे वादग्रस्त वक्तव्य करून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळेंनी खळबळ माजवली आहे. आपल्या देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्याप्रमाणेच खाद्यस्वातंत्र्यही आहे. कोणी कधी, कुठे, कसे, काय खावे, काय प्यावे, यावर संविधानाचे कोणतेही बंधन नाही. मात्र शास्त्रामध्ये कोणत्या काळात काय खाऊ नये यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत. आरोग्याच्या दृष्टीने सुद्धा ही पथ्ये महत्त्वाची असतात. तामसिक अन्नपदार्थ शरीरात वासना, क्रोध, अशांती, आक्रमकता आणि अस्वस्थता वाढवतात, असे मानले जाते. अशा अन्नाचे सेवन केल्याने व्यक्तीचे मन अशांत आणि विचलित होते, ज्यामुळे त्याला पूजा-पाठ आणि ध्यानामध्ये पूर्णपणे एकाग्र होता येत नाही. आपल्या असल्या वक्तव्यांमुळे समाजातील काही श्रद्धाळू लोकांच्या भावनांना धक्का पोचतो, याचे भान जबाबदार राजकीय नेत्यांनी तरी ठेवलेच पाहिजे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# छातीत चाकु खुपसून जिवे ठार मारुन फरार झालेल्या आरोपीस १२ तासाच्या आत केले जेरबंद

## बीड पोलीसांची उल्लेखनिय कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ सप्टेंबर**

दि.०२/०९/२०२५ रोजी २३:३० वा.चे सुमारास शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत महाराणा प्रताप चौक, बीड येथे इसम नामे अभिषेक राम गायकवाड व विजय सुनिल काळे यांचेत शुल्लक शाब्दीक वादावरुन इसम नामे अभिषेक राम गायकवाड याने त्याचेकडे असलेल्या धारदार चाकुने विजय सुनिल काळे याचे डावे बाजुस छातीत वार करुन गंभीर जखमी करुन जिवानीशी ठार मारुन तो पळुन गेला होता. सदर आरोपी विरुध्द सुनिल मारोती काळे वय ४७ वर्षे, व्यवसाय-शिव जेन्टंस पार्लर चालक, रा. बाराभाई गल्ली धारुर ता धारुर जि.बीड ह.मु. स्वराज्य नगर, बार्शी रोड, बीड यांनी दिले फिर्यादी वरुन शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुरनं. ४५२/२०२५ कलम १०३ बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल झाला.

त्यावेळी सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने सदर गुन्ह्याची तात्काळ दखल घेवुन गुन्हयातील फरार आरोपी अभिषेक राम गायकवाड याचा शोध घेणेकामी मा. वरिष्ठांचे आदेशान्वे पोलीस ठाणे शिवाजीनगर येथील चार पथक व स्थागुशा बीड येथील दोन पथक अशी वेगवेगळया पथके तयार करुन वेगवेगळया परिसरात शोध घेणेकामी रवाना केले होते. रात्रभर फरार आरोपीचा शोध घेत असतांना आरोपी अभिषेक राम गायकवाड हा काकडहिरा ता. पाटोदा जि.बीड शिवाराचे परिसरात डोंगरात दबा धरुन बसल्याची गोपनीय माहिती मिळल्यावरुन सदर ठिकाणी तात्काळ पथक रवाना करुन सदर आरोपीचा मोठ्या शिताफीने व कसोशीन डोंगर दऱ्यात शोध घेवुन तो पळुन जात असतांना डोंगरामध्ये त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेवुन गुन्ह्यात अटक केली आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनित कॉंवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग बीड श्री. हनपुडे पाटील साहेब यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. किशोर पवार, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड, सहा. पोलीस निरीक्षक विलास मोरे, संदिप दुनगहु, गजानन क्षिरसागर, ग्रेडपोउपनि / वासुदेव मिसाळ, पोहवा/१६६४ रवी आघाव, पोहवा/५६२ भास्कर केंद्रे, पोना/१२४४ संतोष राऊत, पोहवा/५१ माने, मपोह अनिता खरमाटे, पोना/४७० ज्ञानेश्वर मराडे, पोशि/२०७७ बाळु रहाडे, पोशि/३०५ दिलीप राठोड, पोशि/ ६१७ अशोक राडकर, पोशि/ ४८५ विलास कांदे, पोशि/१३८५ राजेभाऊ जाधव, पोशि/७७७ लादे, पोशि/२७३ नवनाथ डाके, पोशि/९०४ लिंबाजी महानोर, पोशि/१९३ अमोल लोंढे व स्थागुशा, बीड येथील पोहवा/१६२६ राहुल शिंदे, पोहवा/७३२ दिपक खांडेकर यांनी केली आहे.

# केज तालुक्यात वरपगाव ग्रामस्थांचा भव्य कॅन्डलमार्च

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३ सप्टेंबर**

तालुक्यातील वरपगाव येथे मंगळवारी सायंकाळी मराठ सेवक सतीश ज्ञानोबा देशमुख यांना श्रद्धांजली देण्यासाठी गावातून कॅन्डलमार्च काढण्यात आला.




वरपगावच्या सतीश देशमुख यांचा मुंबई आंदोलनात सहभागी होऊन जात असताना शिवनेरी मुक्कामानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी प्रवासादरम्यान रक्तदाब वाढल्याने मृत्यू झाला होता. त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी या घटनेवर दु:ख व्यक्त केले होते. त्यांनी कुटुंबाप्रती संवेदना व्यक्त करून सतीश देशमुख यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही असे म्हटले होते. आम्ही यशस्वी होऊनच परत येऊ असा आत्मविश्वास व निर्धार व्यक्त केला होता. आंदोलन संपल्यानंतर वरपगाव येथे जाऊन सतीश देशमुख यांच्या परिवाराची भेट घेणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. शासनाने सतीश देशमुख सह आंदोलनात बळी गेलेल्या आंदोलकांच्या परिवारातील किमान एका नातेवाईकाला सरकारी नोकरीत सामावून घ्यावे अशी मागणीही शासनाकडे केलेली आहे. मंगळवारी शासनाने मागण्या मान्य करताच वरपगावच्या ग्रामस्थानी सायंकाळी ७ वाजता गावातून भव्य केंडलमार्चचे आयोजन केले. यावेळी 'भारत माता की जय, जय जिजाऊ जय शिवराय, मनोज दादा तुम आगे बडो, वंदे मातरम्, सतीश देशमुख अमर रहे, अमर रहे! यासारख्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. त्यानंतर गावच्या हनुमान मंदिर परिसरात काही वक्तृयांनी भाषने झाली व राष्ट्रगीताने कार्यक्रम संपला. यावेळी गावातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मोंढा गणपतीला साडेतीन शक्तीपीठांचा देखावा : भाविकांना अनोखा भक्तीमय अनुभव

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ सप्टेंबर**

माजलगाव येथील प्रसिद्ध मोंढा गणपती मंडळाने यंदा गणेशोत्सवाच्या निमित्ताने आकर्षक साडेतीन शक्तीपीठांचा देखावा साकारला आहे. धार्मिकता, कलात्मकता आणि आधुनिक प्रकाशयोजनेचा अनोखा संगम साधत भाविकांना एक आगळीवेगळी भक्तीमय अनुभूती मिळत आहे.

या देखाव्यात तुळजाभवानी (तुळजापूर), महालक्ष्मी (कोल्हापूर), रेणुकामाता (माहूर) आणि सप्तशृंगी देवी (वणी-अर्धपीठ) यांची सुंदर रचना करण्यात आली आहे. प्रत्येक शक्तीपीठाचे सुस्पष्ट माहितीफलक यामुळे भाविक थक्क होत आहेत.

विशेष म्हणजे, संध्याकाळच्या वेळी याठिकाणी केली गेलेली आकर्षक रोषणाई आणि फवाऱ्यांचे कारंजे देखाव्याला अधिक भव्यतेची जोड देतात.आज, दिनांक ४ सप्टेंबर रोजी, मंडळाच्या वतीने सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत महाप्रसादाचे व सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत महारक्तदान शिबिर आयोजन करण्यात आले असून, स्थानिक ब्लड बँकेच्या सहकार्याने हे शिबिर पार पडणार आहे. मंडळाने सर्व श्रद्धाळू भाविक व नागरिकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.गणेशोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत, मंडळाचे हे उपक्रम स्तुत्य ठरत आहेत. धार्मिकतेबरोबरच समाजसेवेचा आदर्श या निमित्ताने समोर येत आहे.

हजारो भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांचे परिश्रम यामुळे यंदाचा मोंढा गणपती उत्सव संस्मरणीय ठरत आहे.

### आज महाप्रसाद व महारक्तदान शिबिराचे आयोजन सर्व भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन



# बडतर्फ पोलीस निरिक्षक सुनील नागरगोजे यांची आत्महत्या



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३ सप्टेंबर**

पोलिस दलातील माजी पोलीस निरिक्षक सुनील रामराव नागरगोजे (वय ५७) यांनी अंबाजोगाई येथील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. आज सोमवारी (दि.०१) रात्री ८ वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली.

सुनील नागरगोजे हे मूळ परळी तालुक्यातील नागदरा येथील राहिवासी होते. अनेक वर्षांच्या सेवेनंतर मागील काही महिन्यांपूर्वी ते नोकरीतून बाहेर पडले होते. नुकतेच त्यांनी अंबाजोगाई येथील घर बांधकामासाठी पडल्याने ते प्रशांत नगर येथे किरायाने राहत होते. त्या ठिकाणीच त्यांनी सोमवारी रात्री घरात कोणी नसताना सिलिंग फॅनला गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह स्वाराती रुग्णालयात पाठवून दिला. दरम्यान, सुनील नागरगोजे यांच्या आत्महत्येमागचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. अंबाजोगाई शहर पोलीस पुढील तपास करत आहेत.

परभणी येथे कार्यरत असताना एका पोलीस अधीक्षकांना शिवीगाळ केल्याचा आरोप त्यांच्यावर झाला होता. या प्रकरणाची चौकशी सुरू असतानाच, बीड येथे बदली झाल्यानंतर त्यांनी पुन्हा एका कर्मचाऱ्याला शिवीगाळ करत धमकी दिली होती. त्यामुळे त्यांना बीड येथे नियंत्रण कक्षातच सीमित ठेवण्यात आले होते.

**एप्रिल २०२५ मध्ये सेवेतून बडतर्फ**

यानंतर परभणीतील शिस्तभंग प्रकरणात एप्रिल २०२५ मध्ये त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले. बडतर्फीनंतर नागरगोजे हे नैराश्यात गेले होते. सध्या त्यांची मुले पुण्यात शिक्षण घेत आहेत. त्यांच्या पत्नीही सध्या पुण्यात मुलांजवळ असल्याचे सांगितले जात आहे.

# सणासुदीच्या पार्श्वभूमीवर पीएनजीची प्युअर प्राइस ऑफर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ सप्टेंबर**

पीएनजी ज्वेलर्सने पुन्हा एकदा आपली बहुप्रतीक्षित प्युअर प्राइस ऑफर मोहिम सुरू केली असून १ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. ही योजना आगामी सण व लग्नसराईच्या हंगामात ग्राहकांना सोने खरेदी करताना आर्थिक दिलासा देण्यासाठी खास तयार करण्यात आली आहे.



सोन्याच्या किंमतीत सतत होणाऱ्या वाढीचा विचार करता या योजनेत ग्राहकांना त्यांच्या आवडीचे सोनं किंवा हीऱ्यांचे दागिने १ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२५ या कालावधीत विद्यमान दराने प्री-बुक करण्याची संधी मिळते जर नंतर सोन्याचा दर वाढला, तरीही त्यांना आधीच्या कमी दराचा लाभ मिळतो. आणि जर दर कमी झाला, तर पीएनजी ज्वेलर्स बिलिंगवेळी कमी झालेला दर मान्य करून ग्राहकांना दिलासा देणार आहे.

या मोहिमेबाबत पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, भारतीय कुटुंबांसाठी सोनं ही केवळ गुंतवणूक नसून भावनिक आणि सांस्कृतिक दृष्टीनेही महत्त्वाची गोष्ट आहे. प्युअर प्राइस ऑफर च्या माध्यमातून आम्हाला ग्राहकांना पारदर्शक, निश्चित आणि फायद्याचा खरेदी अनुभव द्यायचा आहे. हीच ग्राहक आणि पीएनजी ज्वेलर्समधील विश्वासाची जोडणी आहे. प्युअर प्राइस ऑफर चा लाभ पीएनजी ज्वेलर्सच्या महाराष्ट्रातील सर्व लनांमध्ये घेता येणार आहे.

# महाराष्ट्र राज्य पात्रता चाचणी (एम-सेट) परीक्षेत प्रिंयका वशिष्ट कागणे (नेहरकर) उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३ सप्टेंबर**



जून २०२५ मध्ये सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठा अंतर्गत सहाय्यक प्राध्यापकांसाठी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य पात्रता चाचणी (एम एच-सेट) परीक्षेत प्रिंयका वशिष्ट कागणे (नेहरकर)या केमिकल सायन्स या विषयात मध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून महाराष्ट्रामधून पात्र ठरल्या आहेत.

प्रिंयका कागणे यांनी या पूर्वी पदव्युत्तर पदवी परीक्षा पूर्ण केली होती. जून २०२५ मध्ये एसपीपीयू नोडल एजन्सी यूजीसी मान्यताप्राप्त आणि महाराष्ट्र आणि गोवा सरकारने नामांकित केलेल्या सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठा अंतर्गत सहाय्यक प्राध्यापकांसाठी महाराष्ट्र राज्य पात्रता चाचणी (एम एच-सेट) परीक्षा घेण्यात आली होती. या मध्ये प्रिंयका व वशिष्ट कागणे (नेहरकर) या केमिकल सायन्स या विषयात मध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून महाराष्ट्रामधून पात्र ठरल्या आहेत. ३० ऑगस्ट २०२५ रोजी त्यांचा सहाय्यक प्राध्यापकांच्या पात्रता परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून यात प्रिंयका कागणे या चांगल्या मार्कांने पात्र ठरल्या आहेत.प्रिंयका कागणे या मुंबई येथे कार्यरत असलेले पोलीस सब इन्स्पेक्टर वशिष्ट कागणे यांच्या कन्या असून प्रिंयका यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# अंबाजोगाईत दुर्दैवी अपघात; बसमधून उतरताना पदर अडकून महिलेचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३ सप्टेंबर**



शहरालगत मोरेवाडी परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ आज सकाळी झालेल्या अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला.विजयमाला सरवदे (वय ५७, रा. केज) असे मृत महिलेचे नाव आहे. त्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत होत्या.

घटनेची माहिती अशी की, विजयमाला सरवदे नोकरीच्या निमित्ताने दररोज केजहुन अंबाजोगाईला ये-जा करत असत. आज सकाळी देखील त्या अंबाजोगाईला येण्यासाठी धारूरहून परळीच्या दिशेने निघालेल्या बसमध्ये (एमएच १४ एमएच २३४७) बसल्या. या बसने अंबाजोगाई येथे थांबा घेतल्यावर विजयमाला सरवदे या उतरू लागल्या. त्यावेळी त्यांच्या साडीचा पदर बसमध्ये अडकला आणि त्या खाली कोसळल्या. इतक्यात बस पुढे निघाली आणि त्यांच्या दोन्ही पायांवरून चाक गेले.निघाली आणि त्यांच्या दोन्ही पायांवरून चाक गेले.त्यांनातत्काळ त्यांना गंभीर जखमी अवस्थेत स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले, मात्र उपचारा पूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे रुग्णालयात शोककळा पसरली असून सहकारी कर्मचारी आणि स्थानिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. पुढील तपास अंबाजोगाई पोलीस करत आहेत.

# भाजपा बीड शहर तर्फे गणेश मंडळाच्या माध्यमातून स्वदेशीचा नारा-अशोक लोढा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ सप्टेंबर**



संपूर्ण जगामध्ये भारत देश हा तिसरी महासत्ता होणारा देश म्हणून आपली ओळख निर्माण करत असल्यामुळे अमेरिका सारख्या बलाढ्य महासत्तेला त्याची खदखद होताना दिसत आहे मागील दोन महिन्यापासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शंभर टक्के टेरिफ दर वाढवून भारतीय वस्तूंना अडचणीत आणण्याचा कुटील डाव रचला आहे भारताचे रशियासोबत व आता चीन सोबत सुधारत असलेले संबंधामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प भारताला अडचणीत आणण्यासाठी नवनवीन कायद्याच्या माध्यमातून त्रास देण्याचा प्रयत्न करत आहेत मागील दहा वर्षांमध्ये भारताची झालेली चौफेर प्रगती व जगात माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी विविध देशांशी सौंदाहर्यपूर्ण संबंध प्रस्थापित करून आपल्या भारताचे नाव जगात उंचावण्याचे काम केले आहे. राष्ट्रपती ट्रम्प यांनी भारताविरुद्ध लादलेल्या टेरिफला विरोध करण्यासाठी मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी स्वदेशीचा नारा दिला आहे. येणाऱ्या काळात देशांमध्ये गणेशोत्सव, नवरात्री, दीपावली असे महत्त्वाचे व मोठे सण साजरे करत असताना परकीय वस्तूचा विशेषतः अमेरिकन वस्तूच्या वापरावर बहिष्कार टाकून स्वदेशी वस्तूचा वापर करावा तसेच गणेशोत्सव, नवरात्री व दीपावली मध्ये भारतीय नागरिकांमध्ये विविध स्पर्धा, देखावे, पथनाट्याच्या माध्यमातून स्वदेशीचा नारा देण्यात यावा असे आव्हान केले आहे. भारतीय जनता पार्टी बीड शहर मंडळाच्या वतीने बीड शहरातील विविध गणेश मंडळाला विविध स्पर्धा देखावे व स्वदेशीचे फलक लावून स्वदेशी वस्तु बद्दल जनजागृती करण्याबाबत व पर्यावरण पूरक देखावे करणाऱ्या मंडळाला रोख पारितोषक प्रथम पुरस्कार -७००१/- द्वितीय पुरस्कार - ५००१/-, तृतीय पुरस्कार -३००१/- आणि प्रोत्साहन पर-११०१/- पाच मंडळाला व सन्मानपत्र देऊन सन्मानित केले जाणार आहे. शहरातील सर्व प्रमुख गणेश मंडळांना विनंतीपूर्वक आव्हान करण्यात येते की आपण या राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवून हातभार लावावा असे आव्हान बीड शहर भारतीय जनता पार्टी अध्यक्ष अशोक लोढा यांनी केले आहे.

# बीडच्या विमानतळाचा प्रश्न मार्गी लावा

## बीड जिल्हा जनता विकास परिषदेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ सप्टेंबर**

बीडच्या विमानतळाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा अशी मागणी बीड जिल्हा जनता विकास परिषदेने उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठवाड्यात बीड सोडल्यास सर्वत्र विमानतळ आहे. बीड त्यास अपवाद आहे. आपल्या प्रयत्नामुळे बीडच्या विमानतळास मान्यता मिळाली आहे.




आता विमानतळाचे काम लवकर मार्गी लावावे अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच पुणे ते बीड रेल्वे सुरू करावी अशी मागणी आहे. या निवेदनावर बीड जिल्हा जनता विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगवान, सर्वोत्तम गावरस्कर, तालुका उपाध्यक्ष दिलीप खिस्ती, कोषाध्यक्ष अतुल कुलकर्णी, दिनेश लिंबेकर, मंगेश निटुरकर, राजेंद्र होळकर, नरेंद्र कांकरिया, अविनाश वाघीरकर, कृष्णा शिंदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ओबीसी समाजाकडून मराठा आरक्षणाच्या शासन निर्णयाची होळी

## ओबीसी समाजातील ४०० हून अधिक जातींवर गदा येणार?



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ सप्टेंबर**

राज्य शासनाने मराठा आरक्षणबाबत काढलेल्या नवीन शासन निर्णयामुळे ओबीसी समाजातील ४०० हून अधिक जातीवर गदा येणार असून हा अन्यायकारक, बेकायदेशीर निर्णयाची ओबीसी समाजाकडून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर होळी करीत शासनाला निवेदन सादर करण्यात आले आहे.

राज्य शासनाने मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर दि २ सप्टेंबर २०२५ रोजी मराठा समाजातील काही व्यक्तींना मराठा-कुणबी समाजाशी जोडून ओबीसी प्रमाणपत्र मिळवून देण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे. हा शासन निर्णय पूर्णपणे अन्यायकारक, बेकायदेशीर व असंवैधानिक आहे. या निर्णयामुळे ओबीसी समाजातील ४०० हून अधिक जातींच्या हक्कांवर गदा येणार असून त्यांच्या शिक्षण व नोकरीच्या क्षेत्रात होणारे प्रतिनिधीत्व गंभीर स्वरूपात घटणार आहे.

त्यामुळे घटनात्मक उल्लंघन अनुच्छेद १५(४), १६(४) प्रमाणे आरक्षण हे फक्त सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीयांना देता येते. मराठा समाजाचा समावेश हा तत्वांचा भंग आहे. अधीच मर्यादीत संधी असलेल्या ओबीसी समाजातील घटकांना आणखी मागे ढकलले जाईल. सर्वोच्च न्यायालय व विविध आयोगांनी स्पष्ट केले आहे की, केवळ राजकीय दबावाखाली जातीचा समावेश आरक्षणात करता येत नाही असे असतांना शासनाने मराठा समाजाला आरक्षणाचा निर्णय काढला आहे. हा शासन निर्णय तत्काळ मागे घेण्यात यावा, ओबीसी आरक्षणात कोणत्याही समाजाचा अन्याय समावेश होऊ नये, ओबीसी समाजाचे प्रतिनिधीत्व, हक्क आणि आरक्षण संरक्षित रहावे यासाठी शासनाने ठोस धोरण जाहीर करावे या विरोधात बुधवारी ओबीसी समाजाच्यावतीने येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करीत शासनाच्या निर्णयाचा निषेध करीत होळी करण्यात आली तसेच निर्णय मागे न घेतल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ओबीसी समाजाकडून देण्यात आला आहे.

यावेळी डॉ नागोराव जांभूतकर, चंद्रकात लव्हाळे, दिनकर कोकरे, ॲड पंजाब चव्हाण, शेषराव मांदळे, विठ्ठल सांगळे, रमशे सानप, सुदाम पुरजळकर, सुभाष कदम, गजानन सातव, अनिल सातव, तान्हाजी गोरे, बाल-ाजी घुगे, प्रकाश गिराम, सुरेश जहीरव, अब्दुल हकीम बागवान, चंद्रशेखर उबाळे, सखाराम शिंदे, माणिक घोडके, गोपाल सातपूते, अमोल पवार, गणेश कोंढाणे, सागर चौधरी, गंगाधर हनुमाने, साहील चौधरी आदींची उपस्थिती होती.

# हमारा विद्यालय, हमारा स्वाभिमान स्तुत्य उपक्रम- आ. मुटकुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ सप्टेंबर**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंतुले नगर येथे दि २ सप्टेंबर २०२५ रोजी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघ संलग्न महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागातर्फे आयोजित हमारा विद्यालय हमारा स्वाभिमान हा संकल्प विद्यार्थी, पालक, शिक्षक यांनी घेतला.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी हमारा विद्यालय हमारा स्वाभिमान हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, जबाबदारीची जाणीव व भावनिक विकास करणारा आहे असे गौरोद्गार काढले. त्यांनी जिल्हा परिषद शाळांचा दर्जा चांगला होत चालला असून असे प्रतिपादन करून जिल्हा परिषद अंतुले नगर शाळेला दहा संगणक देण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ड. शिंदे, हमीदभाई प्यारेवाले, शालेय व्यवस्थापन अध्यक्ष माधव भवर, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे मराठवाडा कार्याध्यक्ष निळकंठ गायकवाड, मराठवाडा उपाध्यक्ष कुंडलिक निर्मले, शिक्षण विस्तार अधिकारी, असोले केंद्रप्रमुख पांडुरंग शिंदे, कवी, लेखक हर्षवर्धन परसावळे, ग्रामपंचायत सदस्य जयदीप माने, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष सौ. माने याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक गणेश कराळे हे होते. निळकंठ गायकवाड यांनी आमची शाळा आमचा स्वाभिमान हा संकल्प सर्व पालक, विद्यार्थी, शिक्षक यांना दिला. श्रीमती मीरा कदम(गणगे) यांनी विद्यार्थ्यांसाठी नवीन खोल्या व संगणकाची मागणी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निळकंठ गायकवाड यांनी केली तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मनोज लिंबेकर, प्रभाकर घुगे, अरुण कांबळे, श्रीमती घोडके, श्रीमती भंडगे, श्रीमती घोंगडे, श्रीमती संगेवार यांनी प्रयत्न केले. आभार प्रदर्शन अनिल पोपलाईतकर यांनी केले.

# हिंगोली, औंढा येथे आरक्षणाच्या शासन निर्णयानंतर मराठा बांधवांकडून जल्लोष साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ सप्टेंबर**



शासनाने मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी नवीन शासन निर्णय लागू केल्यानंतर हिंगोली, औंढा नागनाथसह अनेक ठिकाणी गुलालाची उधळण करीत जल्लोष साजरा केला आहे. यावेळी मिरवणुक काढण्याल आली तसेच मिठाईचे वाटपही करण्यात आले. या निमर्णयामुळे मराठा बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मागील पाच दिवसापासून मुंबई येथील आझाद मैदानात उपोषण सुरू केले होते. या उपोषणाला पाठींबा देण्यासाठी जिल्ह्यातील हजारो मराठा बांधव मुंबईत दाखल झाले होते. तसेच आंदोलकांसाठी जिल्हाभरातून भोजनासाठी साहीत्य पाठविण्यात आले होते. शासनाने दि २ सप्टेंबर रोजी उपोषणाची दखल घेत उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समितीने मनोज जरांगे यांची भेट घेत त्यांना आरक्षणाचा मसुदा दाखविला त्यानंतर लगेच शासन निर्णयही जारी करीत हैद्राबाद गॅझेटियर लागु केले. त्यानंतर मनोज जरांगे यांनी उपोषण सोडले. शासनाने मागण्या मान्य केल्याचे वृत्त धडकताच हिंगोली जिल्ह्यात मराठा बांधवांकडून जल्लोष साजरा करण्यात आला. येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूतळ्यासमोर सकल मराठा समाजाच्यावतीने गुलालाची उधळण



करीत ढोल ताशांच्या गजरात जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, सुनील पाटील गोरेगावकर, बालाजी वानखेडे, रणजीत पाटील गोरेगावकर, ॲड अमोल जाधव, त्र्यंबकराव लोंढे आदींची उपस्थिती होती.

औंढा नागनाथ येथेही मराठा बांधवांकडून नागनाथ मंदिरात १०१ लिटर दुधाचा दुग्धाभिषेक करण्यात आला. तसेच शासनाने मागण्या मान्य केल्यामुळे शहरातील मुख्य रस्त्यावरून मिरवणुक काढीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने मराठा समाजातील बांधव उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### देवठाणा येथे स्मशानभूमीसाठी जागा द्या

हिंगोली- तालुक्यातील देवठाणा येथे स्मशानभूमी नसल्यामुळे गावकऱ्यांना मयताचे अंत्यसंस्कार करण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. या गावातील स्मशानभूमीसाठी जागा देऊन स्मशानभूमीचे बांधकाम करण्यात यावे या मागणीसाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांना निवेदन सादर केले. येत्या आठ दिवसात स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी न लावल्यास दि ११ सप्टेंबरपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा निवदेनात देण्यात आला आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते मुनीर पठाण, भीमाबाई धवसे, आम्रपाली धवसे, सिंधू इंगोले, वैशाली धवसेख, बेबाबाई धवसे, दर्शना दिपके आदींसी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### जश्ने ईद मिलादुन्नबी निमित्त आरोग्य शिबीर

हिंगोली- दरवर्षी प्रमाणे जश्न ईद मिलादुन्नबी निमित्त तर्फे दरवर्षी प्रमाणे आरोग्य शिबीर, च्या कार्यक्रमाचे आयोजन दि.०५. सप्टेबंर २०२५ शुक्रवारीवेळ सकाळी १०.०० ते दु.३.०० वाजे पर्यंत रजा मैदान , पेन्शनपुरा मस्जिद जवळ, मंगळवारा रोड हिंगोली येथे आयोजीत केले असून सदर आरोग्य शिबीरामध्ये शारिरीक तपासणी, डोळयाची तपासणी व लागणारे औषधी, गोळया मोफत वाटप करण्यात येणार आहेत. सदरील कार्यक्रमाला जास्तीत जास्त उपस्थीत राहण्याचे आवाहन जश्न ए- ईद मिलादुन्नबी च्या वतीने करण्यात आले आहे.करीता सदर कार्यक्रमाच्या माहिती करीता अहेमद खान रजवी मो नं. ९९२३७८६३१० व नसीरखान रजवी मो नं. ९८२२४१५३०७ वर संपर्क साधावा.

### गणेश विसर्जन मार्ग, पॉइंटची पाहणी



हिंगोली- अनंत चर्तुदशीच्या दिवशी शहरातील गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर उपविभागीय पोलीस अधिकारी आंबादास भुसरे आणि नगरपरिषदचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे, हिंगोली शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप मोदे, महावितरणचे अधिकारी बेलसरे, नगर अभियंता प्रतीक नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, अंमलदार संजय तोडेवाले, माजी नगरसेवक चंद्रकांत लव्हाळे, यांनी शहरातील महादेव वाडी लगत असलेल्या बेलवाडी पुलावर गणपती विसर्जन पॉईंट केली पाहणी केली. यावर्षी जलेश्वर तलावाच्या सौंदर्यकरणाचे काम चालू असल्यामुळे तसेच चिराक्षा तलावात पाणी कमी असल्यामुळे यावर्षी गणपती विसर्जनासाठी शहरातील महादेववाडी लगत असलेल्या बेलवाडी पुलावर गणपती विसर्जन करण्याचे निश्चित करण्यात आले आहे अशी माहिती विश्वसनीय सूत्रांच्यावतीने देण्यात आली.

# हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात रक्तदान शिबीरात ६० बाटल्यांचे रक्तसंकलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ सप्टेंबर**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हिंगोली ग्रामीण पोलीस ठाण्याच्या वतीने पहिल्यांदाच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजाशी नाळ जुळवणाऱ्या या उपक्रमाने पोलीस दलातील मानवी संवेदनशीलतेचे दर्शन घडवले. यावेळी ६० बाटल्या रक्तसंकलन करण्यात आले.

या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन पोलीस निरीक्षक शामकुमार डोंगरे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले असून, हिंगोली जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली हे रक्तदान शिबिर यशस्वीपणे पार पडले.

रक्तदान शिबिरात पोलीस अधिकारी, महिला पोलीस अधिकारी तसेच पोलीस कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यामध्ये एकूण २१ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी रक्तदान केले. हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये रक्तदान करण्याचा हा पहिलाच उपक्रम असल्याने या सामाजिक कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सर्व रक्तदात्या पोलीस अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र पोलीस दलाने अशा उपक्रमांद्वारे समाजात सकारात्मकता निर्माण करणे गरजेचे आहे. यावेळी पोलीस निरीक्षक शामकुमार डोंगरे

पोलीस उपनिरीक्षक राहुल घुले, महिला पो. उपनिरीक्षक श्रीदेवी वघे, विजय चव्हाण, प्रकाश कांबळे,सुधीर ढेंबरे, नंदकिशोर जाधव, विजय बबनराव चव्हाण,आशिष उंबरकर, नवनाथ वामन, रवी बांगर, सुवर्णा पोले, विकास कानखेडे आदींनी रक्तदान केले. या उपक्रमामुळे पोलीस दलाची समाजातील सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट होणार असून, इतर जिल्ह्यांतील पोलीस ठाण्यांनीही असे उपक्रम राबवावेत, असे आवाहन करण्यात आले.

# शालेय कराटे स्पर्धेत बांगर विद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ सप्टेंबर**

हिंगोली लिंबाळा एम आय डीसी स्थित जिल्हा क्रीडा संकुल हॉलमध्ये क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व हिंगोली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय कराटे स्पर्धेत औंढा तालुक्यातील जलालदाभा येथील श्रीमती पंचफुलाबाई फकीरराव बांगर कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

या महाविद्यालयाचा अकरावीत शिकणारा नियमित विद्यार्थी गणेश संतोष पर्डे हा विद्यार्थी १७ वर्षे वयोगटातून प्रथम क्रमांक द्वितीय रंगनाथ टाकणखार,कन्हैया भोकरे, आदित्य उबाळे यांनी यश संपादन केले. जिल्ह्यातून प्रथम व द्वितीय आलेले विद्यार्थी विभागीय स्तरावर होणाऱ्या कराटे स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे कॉलेजचे प्राचार्य गजानन कुटे प्रा. राम भुक्तर, प्रा मेघराज सुर्यवशी,प्रा गजानन वाबळे प्रा संतोष कायंदे, प्रा आनुजा जोंधळे, प्रा द्रोपदा जगताप प्रा संदीप जायभाये, गजानन चव्हाण मन्मथ मुर्गे, जिल्हा क्रीडा शिक्षक श्री एम टी चव्हाण, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावर, आत्माराम बोथीकर प्रवीण कोंडेकर गणेश बोडके निळकंठ श्रावण संदीप गाडे जिल्हा कराटे संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोपाल इसादे, कराटे प्रशिक्षक राजाभाऊ टाकणखार यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व पुढील विभागीय स्तरावर खेळासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# शनिवारी बासांपूजनाने ऐतिहासिक दसरा महोत्सवाला सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ सप्टेंबर**

येथील ऐतिहासिक दसरा महोत्सवाला दि ६ सप्टेंबरपासून बासांपूजनाने सुरूवात होणार असून यानिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक तसेच धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहीती उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी दिली आहे.



दसरा महोत्सवात कृषी व औद्योगिक प्रदर्शनीमध्ये २३५ स्टॉल उभे करण्यात आले असून दसरा मैदानावर १०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. रविवारी दि २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजता जलेश्वर मंदिरात आकाशवाणी कार्यक्रमाने दसरा महोत्सवाला सुरूवात होणार आहे. दि २२ रोजी सायंकाळी मिरवणुकनंतर कृषी व औद्योगिक प्रदर्शनीचे उद्घाटन दि २३ रोजी दुपारी बारा वाजता राम जन्माचा कार्यक्रम त्यानंतर दि २ आक्टोबर रोजी रात्री ११.५३ वाजता ५१ फुटी रावण दहनाचा कार्यक्रम होणार आहे. ११ स्टॉल शासकीय योजनांच्या जनजागृतीसाठी राखीव ठेवले जाणार आहेत. यावेळी तहसीलदार श्रीकांत भूजबळ, मधुकर खंडागळे यांची उपस्थिती होती.

# रेल्वे विभागाच्या निबंध स्पर्धेत सांदीपनी पब्लीक स्कूलचे घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ सप्टेंबर**



सांदिपनी पब्लिक स्कूल, तरोडा बुद्रुक, नांदेड येथील विद्यार्थ्यांनी भारतीय रेल्वे विभागाने आयोजित निबंध स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. वंदे भारत- भारतीय रेल्वेची आधुनिक दिशेने वाटचाल या विषयावर घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत नांदेड शहरातील अनेक नामांकित शाळांनी सहभाग नोंदवला होता.

या स्पर्धेत सांदिपनी पब्लिक स्कूलची कु समृद्धी गायकवाड, वेदांत नाईक, श्रीकांत मोरे, कु सौख्या पालमकर, कु समृद्धी मुळे, कु स्नेहा वाडेकर या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट निबंध सादर करून स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल खासदार अशोकराव चव्हाण, आमदार अमर राजूरकर, तसेच रेल्वे विभागाचे प्रमुख अधिकारी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या गौरवप्रसंगी शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक विपुल व मुकुल राठोड, मुख्याध्यापिका सौ. क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रित कौर, प्रशासक मारुती मेखाले, आणि समन्वय सल्लागार केदार शर्मा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शाळेच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांनी आपल्या लेखनकौशल्याने शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान मोठ्या प्रमाणावर राबवा - सीईओ मित्रू पी. एम.

## ग्राम पंचायतींना लाखो रुपयांचे बक्षीस जिंकण्याची संधी

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना दि. ३, ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे मोठे योगदान असून ती अधिक बळकट करण्यासाठी राज्यात सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात जिल्ह्यातील प्रत्येक ग्राम पंचायातीनी मोठ्या प्रमाणात सहभागी होवून ग्राम पंचायतीस लाखो रुपयांचे बक्षीस जिंकण्याची संधी प्राप्त करून द्यावी असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. ग्राम विकास विभागाच्या वतीने या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत असून ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करणाऱ्या ग्राम पंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषदांना कामगिरीनुसार प्रोसाहित करण्यासाठी हे अभियान सुरु करण्यात आले आहे. शासनच्या विविध योजनाचा समाजातील सर्व घटकांना लाभ देवून ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचावणे, ग्रामपंचायतीमध्ये लोकसहभागाची चळवळ उभा करणे ग्रामीण नागरिकांना सुलभ रीतीने सेवा देणे, महाराष्ट्रातील थोर साधू संत परंपरेचा सहभाग घेणे, आरोग्य, शिक्षण, उपजीविका, सामाजिक न्याय या मुख्य क्षेत्रामध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती, व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर अशा चार स्तरावर प्रोत्साहन देण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे पुरस्कार अभियान सुरु केले आहे. अभियानाचा कालावधी - १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर असा राहणार आहे. गावाचे मूल्यमापन करण्यासाठी तालुका, जिल्हा विभाग व राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. या अभियानात सहभागी होण्यासाठी ग्रामपंचायतीस स्वंयमुल्यांकन द्वारे अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक १० जानेवारी असणार आहे. तालुकास्तरावरील मुल्यमापन दिनांक ११ जानेवारी ते २६ जानेवारी, जिल्हा स्तरीय मुल्यमापन २८ जानेवारी ते १५ फेब्रुवारी, विभागस्तरीय मूल्यमापन १७ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी तर राज्यस्तरीय मूल्यमापन संपूर्ण मार्च महिना दरम्यान होणार आहे.



मुख्य घटक विषय- सुशासन युक्त प्रशासन १६ गुण, सक्षम पंचायत १० गुण, जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव १९ गुण, मनरेगा व इतर योजनाशी अभिसरण ६ गुण, गाव पातळीवरील संस्था सक्षमीकरण १६ गुण, उपजीविका विकास, सामाजिक न्याय २३, लोक सहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे ५ गुण, तर नाविन्यपूर्ण उपक्रम ५ गुण असे एकत्रित १०० गुणांचे हे मूल्यमापन असणार आहे.पुरस्कार /बक्षीस ग्राम पंचायत-तालुकास्तरावर प्रथम पुरस्कार रु १५ लक्ष, द्वितीय पुरस्कार रु १२ लक्ष, तृतीय पुरस्कार रु ८ लक्ष तर दोन ग्राम पंचायतींना विशेष पुरस्कार प्रत्येकी रु ५ लक्ष रुपयांचा असणार आहे जिल्हास्तरावर- प्रथम पुरस्कार रु ५० लक्ष, द्वितीय पुरस्कार रु ३० लक्ष, तृतीय पुरस्कार रु २० लक्ष.विभाग स्तरावर - प्रथम पुरस्कार रु १ कोटी, द्वितीय पुरस्कार रु ८० लक्ष, तृतीय पुरस्कार रु ६० लक्ष.राज्य स्तरावर- प्रथम पुरस्कार रु ५ कोटी, द्वितीय पुरस्कार रु ३ कोटी, तृतीय पुरस्कार रु २ कोटी.

पुरस्कार /बक्षीस पंचायत समिती- विभाग स्तरावर प्रथम पुरस्कार रु १ कोटी, द्वितीय पुरस्कार रु ७५ लक्ष, तृतीय पुरस्कार रु ६० लक्ष.

राज्यस्तरावर- प्रथम पुरस्कार रु २ कोटी, द्वितीय पुरस्कार रु १.५ कोटी, तृतीय पुरस्कार रु १.२५ कोटी.

पुरस्कार /बक्षीस जिल्हा परिषद - राज्यस्तरावर प्रथम पुरस्कार रु ५ कोटी, द्वितीय पुरस्कार रु ३ कोटी, तृतीय पुरस्कार रु २ कोटी. याशिवाय या अभियानाची जनजागृती, अभियानात लोकसहभाग वाढविण्यासाठी जास्तीत जास्त लोकांना प्रोत्साहीत करणे व कार्यक्रमाची प्रशिद्धी करणाऱ्या विभागातील एका पत्रकारास पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच अभियानास इन्स्टाग्राम, फेसबुक, यु ट्यूब या अँप वर व्यापक प्रसिद्धी देणाऱ्या ३ चॅनल वरून (बातम्या देणाऱ्या चॅनल्स वगळता) यांना राज्यस्तरा वरून पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे. मात्र संबधितांनी अभियान कालावधीत इन्स्टाग्राम, फेसबुक, यु ट्यूब यांचे एकत्रित यापैकी कोणत्याही एका माध्यमावर/दोन माध्यमावर /तीन माध्यमावर १० लाख व्हीवज्स असणारे चॅनल पात्र राहणार आहेत. जे पात्र चॅनलधारक शासनाकडे अर्ज करतील त्यांना पुरस्कार दिले जाणार आहेत. सदरील अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) उदयसिंग राजपूत नियोजन करत आहेत.

## संक्षिप्त

### गणपती विसर्जन स्थळ व मिरवणूक मार्गाची प्रशासनाकडून पाहणी



विसर्जन विहिरीतील गाळ काढून घेण्यात आला आहे. परिसर व मार्गदेखील स्वच्छ करण्यात आला असून स्वच्छतेसह विसर्जन स्थळी संध्याकाळी गैरसोय होऊ नये म्हणून प्रकाशासाठी लाईटची व्यवस्था त्याचबरोबर परिसरातील विसर्जन मार्ग मोकळा करून घेण्यात आला आहे. बाजार समिती संचालक व नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे

तभा वृत्तसेवा
मंठा/ प्रतिनिधी

गणेशोत्सवातील एक भाग म्हणून विसर्जन स्थळाची व मार्गाची प्रशासनातील या संयुक्त पथकातील अधिकाऱ्यांनी पाहणी करून संबंधित विभागास सूचनाही केल्या. यावेळी तहसीलदार कल्याण काळदाते, पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड, बाजार समिती संचालक व नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे, मुख्याधिकारी मनोज उर्कीडे, आरोग्य अधिकारी, फौजदार संतोष माळगे, विठ्ठल केंद्रे, महावितरणचे अभियंता व आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते. यावेळी सभापती बाज पठाण, नगरसेवक सचिन बोराडे, विकास सुर्यवंशी, उबेद बागवान, दिपक बोराडे, एन. डी. दवणे, मुस्तफा पठाण, पोलीस कॉन्स्टेबल आनंद ढवळे, मागीलाल, संतोष बनकर गणेश मंडळाचे अध्यक्ष व मंडळातील पदाधिकारी विजय बोराडे, विकास ठोकरे, वैभव मराठे, दत्ता घुगे, माऊली मिसाळ, वेदांत कुलकर्णी, सुमीत बोराडे, राहुल खरात यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

### गणेशोत्सव व ईदच्या पाश्वभूमीवर ९३ जण तडीपार

तभा वृत्तसेवा
भोकरदन/ प्रतिनिधी

आगामी गणेशोत्सव व ईद -ए - मिलाद च्या अनुषंगाने भोकरदन पोलीस ठाण्याच्या वतीने ९३ जणांवर तडीपारीचे आदेश पारित करण्यात आले आहेत. दि ५ सप्टेंबा रोजी ईद-ए-मिलाद व दि. ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी गणेश विसर्जन असे महत्वाचे सण-उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस ठाणे भोकरदन हद्दीमध्ये जातीय तणावावरून घडलेले हिंदू व मुस्लिम गुन्ह्यातीलतसेच ज्या इसमामुळे सदर उत्सवा मध्ये दखलपात्र व अदखलपात्र स्वरूपाचे गुन्हे घडण्याची शक्यता असल्याने पोलीस ठाणे भोकरदन येथील एकूण ९३ जणांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक जालना यांच्या आदेशान्वये दि. ५ रोजी सकाळी ६ ते दि. ७ रोजी १० पावेतो पोलीस ठाणे भोकरदन हद्दीतून दोन दिवस हद्दपार बाबत आदेश पारित करण्यात आले आहेत. सदरील आरोपी हे पोलीस ठाणे हद्दीतून हद्दपार न झाल्यास त्यांच्यावर कलम १२३ प्रमाणे कार्यवाही होईल. सदरचे हद्दपार प्रस्ताव सादर करणे बाबत पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभाग पोलीस अधिकारी भोकरदन डॉ नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे भोकरदनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत, पो. हे. का. सोमनाथ मंडलिक, पो. ना. प्रशांत उबाळे, पो. ना. उमेश टेकाळे, शरद शिंदे, किशोर मोरे, गणेश पिंपळकर, शिवाजी जाधव, दीपक इंगळे, सुरेश ढोरमारे, योगेश सिंगल आदींनी सदरची कामगिरी केली असल्याचे कळविले आहे.



तभा वृत्तसेवा
पारध /प्रतिनिधी

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यां महाराष्ट्र राज्य सरकारने मान्य केल्यामुळे. पारध व परिसरातील मराठा समाज बांधवामध्ये आनंदाचे वातावरण पसरलेले असुनं मराठा समाजबांधवांनी पेढे वाटुन, फटाक्यांची आतषबाजी करून, तसेच गुलालाची उधळण करीत आपला आनंदोत्सव साजरा केला पारध येथीलंछत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ मराठा तरुण गजानन लोखंडे, उदय लोखंडे, अशोक देशमुख, संजय देशमुख , सागर देशमुख, गणेश लोखंडे, विजय जाणोकार, कृष्णा लोखंडे, विलास जाधव, शंकर लोखंडे, अमरेश्वर देशमुख, ऋषी लोखंडे, जय देशमुख इत्यादी हजर होते

# अनुसूचित जमाती प्रवर्गात बंजारा समाजाला समाविष्ट करून न्याय द्यावा - अविनाश राठोड

तभा वृत्तसेवा
तळणी / प्रतिनिधी

बंजारा (लमाण)समाजास हैद्राबाद गॅझेट नुसार अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गात समाविष्ट करून, घटनात्मक हक्कानुसार बंजारा समाजाला न्याय द्यावा असे निवेदन अविनाश राठोड सह बंजारा समाजातील नागरिकांनी मंठा तहसील कार्यालयातील डी. डी. कुलकर्णी नायब तहसीलदार यांच्या मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना देण्यात आले. या निवेदनात नुसार शासनाला निदर्शनास आणून देण्यासाठी हैदराबाद गॅझेटच्या नोंदीच्या आधारे बंजारा (लमान) समाजासंबंधित हैदराबाद गॅझेट जिल्हा गॅझेट महसूल रेकॉर्ड आणि प्रशासकीय पुरावे स्पष्टपणे दर्शवितात की बंजारा समाज हा रानावनात, भटकणारा, आर्थिक दुर्बळ आणि मूळ आदिवासी स्वरूपाचा आहे. घटनात्मक आधार आणि कलम १४ कायद्यापुढे समानता व समान संरक्षणाचा अधिकार, कलम १५ (१) धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थानाच्या आधारावर भेदभावास बंदी, कलम १५(४) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार,कलम १६ (१) सार्वजनिक सेवांमध्ये समान संधीचा अधिकार, कलम १६ (४) मागास वर्गांसाठी आरक्षणाची तरतूद, कलम -१९ (१) (g) उपजीविकेच्या समान संधीचे संरक्षण (आरक्षणा अभावी हक्क बाधित होतो), कलम २१ जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार (समान संधी व सामाजिक न्याय हा ही जीवनाचा अविभाज्य भाग), कलम ४६ अनुसूचित जाती-जमाती व मागास वर्गांच्या शैक्षणिक व आर्थिक हितांचे संरक्षण करण्याचे राज्याचे कर्तव्य, कलम ३३८ A अनुसूचित जमाती आयोगाला अधिकार व राज्याचे उत्तरदायित्व, आणि सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय (Indra Sawhney vs. Union of India, १९९२ व State of Maharashtra vs. Milind, २०००) स्पष्ट करतात की जातीय ओळख व आरक्षणाबाबत ऐतिहासिक व प्रशासकीय पुरावे ग्राह्य धरले जावेत आणि शासनाने समानतेचा तत्त्वाधार राखणे बंधनकारक आहे. या सर्वच्या अभ्यासानुसार, बंजारा (लमाण) समाजास त्वरित अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करून महाराष्ट्र शासनाने निर्णयक (G.R.) काढून समाजाला न्याय द्यावा. त्याच प्रमाणे अनेक दिवसाचा बंजारा समाजाचा प्रश्न मार्गी लावावा असे निवेदनात बाबा राठोड



यांनी सांगितले आहे. आणि समानता व सामाजिक न्यायाचा घटनात्मक तत्वे राखून तातडीने निर्णय घ्यावा आणि केंद्र सरकारकडे सुद्धा शिफारस करावी अशी नम्र विनंती बंजारा समाजाकडून केली गेली आहे. या निवेदनात अविनाश राठोड मा. सरपंच नायगाव, बाबा राठोड संचालक मार्केट कमिटी मंठा, शरद पवार ग्रा. प. सदस्य वाडेगाव तांडा, रामेश्वर चव्हाण ग्राहक सदस्य वाडेगाव तांडा सेवकराम राठोड मा. सरपंच माळेगाव, श्रीराम जाधव सरपंच खोराड सावंगी,सुभाष चव्हाण सरपंच माहोरा, सचिन राठोड, सरपंच वाघोडा, कुंजन पवार, भगवान चव्हाण, जानू पवार, कृष्णा राठोड, ज्ञानेश्वर चव्हाण, प्रकाश राठोड, संदीप जाधव, विष्णू चव्हाण, विनोद राठोड इतरांच्या सह्या आहेत.

## मनोज पाटील जरांगे यांच्यामुळे मराठा समाजाच्या तरुणांना न्याय मिळाला शिवसेनाव - विष्णू पाचफुले

राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा जीआर काढल्यामुळे जालन्यात व्यापाऱ्यांनी साजरा केला आनंदोत्सव

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना कृषी उत्पन्न बाजार समितीत व्यापाऱ्यांनी शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांच्या नेतृत्वात जल्लोष साजरा केलाय. फटाके फोडून आणि पेढे वाटून व्यापाऱ्यांनी आनंद व्यक्त केलाय. मनोज पाटील जरांगे यांनी गेल्या पाच दिवसापासून मुंबईच्या आजाद मैदान येथे अमरण उपोषणाला बसले होते त्या लढ्याला अखेर यश मिळाले आहे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठा समाजाच्या तरुणाला न्याय देण्याचा प्रयत्न केलाय अखेर मनोज जारंगे पाटील यांच्यामुळेच मराठा तरुणाला न्याय मिळाला असल्याची भावना शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांनी व्यक्त केली आहे. राज्य



सरकारने काल मराठा आरक्षणाचा जीआर काढत मराठा समाजासाठी हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतलाय. राज्य सरकारच्या या निर्णयाच्या समर्थनार्थ जालना कृषी उत्पन्न बाजार समितीत व्यापाऱ्यांनी फटाके फोडून आणि पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला आहे. यावेळी शिवसेना शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव भरतराव तनपुरे व्यापारी निवृती राव पाचफुले, अनिलकुमार सोनी, विरेंद्र रुनवाल, अशोक पाचफु ले, संजय गायकवाड, अजय मिरकड, संजय जाधव, हुकुमचंद पाटनी, संजय कानडे, गनेस नन्नवरे, ओम नन्नवरे, राम पाचफुले, प्रदीप मिसाळ, लक्ष्मण चव्हाण, अनिल पंच, एकनाथ सुराशे पांडू, खांडेभराड सचिन, आनंद चंद्रकांत सराफ, जगदीश मगर, आकाश मोरे, भागाजी चंद, हमीद भाई, रमेश वाबळे, दसरत सरकटे, संतोष कोलते यासह व्यापारी मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## मारवाडी युवा मंच व संमेलनतर्फे भव्य प्रसाद वाटप कार्यक्रम

तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

जालना शहरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात साजरा केला जात आहे. शहरातील विविध मंडळांकडून आकर्षक देखावे, सांस्कृतिक उपक्रम तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. या पार्श्वभूमीवर मारवाडी युवा मंच, जालना व मारवाडी संमेलन, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश भक्तांसाठी भव्य प्रसाद वाटप सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा उपक्रम गुरुवार दि. ४ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६. ३० वाजता गांधी चमन, जुना जालना येथील 'चमनचा राजा गणेश मंडळा' जवळ पार पडणार आहे. गणेश भक्तांना प्रसादाचे वितरण करून एकात्मतेचा व भक्तिभावाचा संदेश या उपक्रमातून देण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या तयारीसाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष नियोजन केले आहे. यात अध्यक्ष चेतन बोथरा, उपाध्यक्ष डॉ. पियुष होलाणी व राम सोमनी, सचिव रमेश मोदी, कोषाध्यक्ष मयुर मालपाणी यांच्यासह कार्यकर्ते उमेश पंचारीया, महेश भक्कड, उमेश बजाज, महावीर जांगीड, दिनेश बरलोटा, शाम लखोटीया, पवन जोशी, रविंद्र संचेती, अजय बोरा, विशाल धुत, दर्पण सकलेचा, अक्षय संचेती, आशिष राठी, सौरभ भकड, कान्हाराम जांगीड, निखील लुनीया, रामलाल सुतार, वर्शन पारख, युवराज धर्मा, हर्ष पंचारीया, कृष्णा उपाध्यक्ष व दर्पण जैन यांचा उत्स्फूर्त सहभाग आहे. आयोजकांनी प्रसाद वाटपासाठी गणेश भक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी अपेक्षित असल्याने सर्वतोपरी सोयी -सुविधांची तयारी केली आहे. विशेषतः शिस्तबद्ध रांगा, स्वच्छता आणि भक्तांना प्रसाद सहज मिळावा यासाठी स्वयंसेवक तैनात राहणार आहेत. "गणेशोत्सव हा फक्त धार्मिक उत्सव नसून सामाजिक ऐक्याचा, एकोपा व सेवा भावाचा संदेश देणारा सोहळा आहे. प्रसाद वाटपाद्वारे आम्ही गणेश भक्तांना भक्तिभावाचा अनुभव देत आहोत. या निमित्ताने समाजातील सर्व घटकांमध्ये एकात्मतेची भावना वृद्धिंगत व्हावी हीच अपेक्षा आहे," असे आयोजक पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या उपक्रमातून गणेशोत्सवात भक्तिभावासोबतच सामाजिक सलोखा व ऐक्य वृद्धिंगत होत आहे

## खरेदी विक्री संघ चेअरमनपदी अच्युतराव कदम तर व्हा. चेअरमनपदी उदयराज तनपुरे यांची बिनविरोध निवड

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना तालुका खरेदी विक्री संघाच्या चेअरमन पदी अच्युतराव कदम व व्हा चेअरमन उदयराज तनपुरे यांची बिनविरोध निवड झाली असून आज दिनांक ०३ सप्टेंबर २०२५ रोजी भाग्यनगर येथील संपर्क कार्यालयात शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री आ. अर्जुनरावजी खोतकर यांच्या शुभहस्ते त्यांचा सत्कार छोटेखानी कार्यक्रमात करण्यात आला. यावेळी आमदार खोतकर यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, उपजिल्हाप्रमुख संतोषराव मोहिते यांच्यासह खरेदी विक्री संघाचे नवनिर्वाचित संचालक शरदराव खडके, बाबुराव बारहाते, गणेश थोरात, हरिभाऊ पोहेकर, धिरेंद्र वांजळे, विष्णू भुतेकर, कल्याण सांगोळे, रामेश्वर देवडे, ज्ञानेश्वर माऊली डुकरे, भीमराव लोंढे, शरद तळेकर, आनंद भिसे, सौ. कावेरी अच्युतराव कदम, संजीवणी शरद तळेकर, श्रीमती शोभाताई भिसे, तुळशीराम गिराम, दलसिंग पवार या संचालकांची उपस्थिती होती. या सर्वांचे आ. अर्जुनराव खोतकर यांनी शाल व पुष्पहार घालून स्वागत केले व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या याप्रसंगी संघाच्या वतीने



चेअरमनच अच्युतराव कदम व संघाचे एमडी श्री पटेल यांनी आ. खोतकर यांचे या निवडणुकीत मोलाचे सहकार्य लाभले व निवडणूक बिनविरोध करून घेतली यामुळे शाल पुष्पहार देऊन सत्कार केला.

# भोकर मध्ये सरकारने काढलेल्या आदेशाची होळी

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ३ सप्टेबर-**

महाराष्ट्र सरकारने प्रस्थापित मराठा समाजाला हैद्राबाद गँजेट लागू करून ओबीसीतून आरक्षण देण्याचा निर्णय घेतल्याने सकल ओबीसी समाजात संतापाची लाट निर्माण झाली असून सरकार तर्फे काढण्यात आलेल्या जी.आर.ची होळी करून आदोलन छेडण्याचा इशारा भोकर तालुका सकल ओबीसी समाजाने दिला आहे. भोकर तालुका सकल ओबीसी समाजा तर्फे दि. ३ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदारा मार्फत दिलेल्या निवेदनात असे म्हटले की महाराष्ट्रातील मराठा समाज जमिनजुमलेदार समाज असुन त्याचेकडे कारखाने बँका शैक्षणिक संस्था मंत्री आमदार खासदार मोठ्या प्रमाणात आहेत.आठरापगड जातीत विखुरलेला ओबीसी भटक्या आलुतेदार बलुतेदार समाजाला संविधानिक रित्या दिलेले अधिकार मनोज जरागे याच्या माध्यमातून मराठा समाज संघटित होवून महागड्या हजारो गाड्या घेऊन मुंबईला आंदोलन करीत सरकारवर दबाव टाकतो हा समाज गरीब कसा असा सवाल निवेदनात करण्यात आला आहे.



मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण दिल्यास सकल ओबीसी समाज महाराष्ट्रात तीव्र आंदोलन छेडेल असा इशारा ओबीसी बांधवांच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.निवेदनावर ओबीसी नेते नागोराव शेंडगे, डॉ. उतम जाधव,राजेश करपे, बी.आर. पांचाळ,माधव करेवाड, अपाराव राठोड, सुरेश बिलेवाड, दता पांचाळ, सुनील चव्हाण, सुभाष नाईक, संदीप गौड, व्यंकट वर्षे वार, बालाजी भोंबे,श्रीनिवास लामगे,खंडेराव शेंडगे,बालाजी नारलेवाड आदिच्या सह्या आहेत.

# ओला दुष्काळ जाहीर करा:माजी आ.जवळगावकर

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. ३ सप्टेबर-**

हदगाव- हिमायतनगर दोन्हीही तालुक्यात गेल्या पंधरा दिवसांपासून मध्ये मध्ये अतिवृष्टी झाली तर मध्ये मध्ये मुसळधार पाऊस सुरू आहे.या वास्तविकतेची नोंद शासन दरबारी आपल्या कडे नोंद आहे. अतिवृष्टी, ढगफुटी सद्रश सततच्या भयावह अशा पावसामुळे संबंध विधानसभा क्षेत्रातील शेती जलमय झाली आहे. विधानसभा क्षेत्रातील दोन्हीही तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी अशी मागणी एका शिष्टमंडळा व्दारे माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांची भेट घेऊन निवेदनाव्दारे करीत वास्तविकता सांगितली आहे.

हदगाव -हिमायतनगर दोन्हीही तालुक्यातील काँग्रेसच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या शिष्टमडळाच्या उपस्थितीत माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर यांनी २ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांची भेट घेऊन विधानसभा क्षेत्रातील अतिवृष्टीमुळे झालेल्या कहराची वस्तुस्थिती कथन केली.ईसापुर धरणाच्या पाण्याचा विसर्गामुळे पैनगंगा,कयाधु आणि कामारी येथील लाखाडी या तिन्ही नद्या आणि हदगाव हिमायतनगर दोन्ही तालुक्यातील सर्व नाले,ओढ्याचे पाणी पुर्णतः शेती व घरात घुसल्यामुळे प्रचंड नुकसान झाले आहे.

काही शेतकऱ्यांची गुरे ढोरे पुरात वाहुन गेली असुन अनेक शैतक-याचे शेती उपयोगी औजारे पुरात वाहुन गेली आहेत.शेतीकडे जाणारे सर्व रस्ते पुरामुळे खरडून गेले असुन काही गावांचा आणि शेतीचा संपर्क तुटला आहे.काही शहरातील दुकानात पाणी घुसल्याने व्यापा-याची देखील मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे.अनेकाच्या घरात पाणी शिरल्याने जीवनावश्यक वस्तूंची हानी झाली आहे.नदिकाठची काही गावांना पुराचा विळख्यामुळे तब्बल सहा दिवस गावाच्या बाहेर पडता आले नाही.सहा दिवस शेतातील पिकात पुर राहिल्याचे सोयाबीन, कापूस नासुन सडल्यामुळे पिके सर्व नष्ट झाली आहेत.नैसर्गीक आपत्तीमुळे शेतकरी पुर्णतः कोलमडल्याने शेतकऱ्यांसह शेतमजुरांवर ऊपास मारीची वेळ आली आहे.नदिकाठची जमीन खरडली असल्यामुळे हेक्टरी १ लाख रुपये नुकसानभरपाई देऊन गुरे,ढोरे व सिंचन साहित्य,शेतीसाठी नुकसान भरपाई देण्यासाठी त्वरित मागणी करुन दिलासा द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी आपल्या निवेदनाची दखल घेऊन शासनाकडे अहवाल देवुन कळविण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी हदगाव हिमायतनगर तालुक्यातील काँग्रेसच्या पदाधिकारी , कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते .

**सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्प रद्द करा**

नियोजित सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पासंबंधी चालू असलेल्या कार्यवाहीसह चर्चेने या भागातील शेतकरी पुर्णतः हवालदिल झाला असुन प्रकल्पात शेती गेली तर आपल्या मुला बाळांचे भविष्याचे काय? असा यक्ष प्रश्न शेतकऱ्यांपुढे ऊभा टाकला आहे.शेतक-यानी कोणतेही टोकाचे पाऊल उचलण्यापुर्वी शासनाकडे जनभावना कळवुन प्रकल्पांची एकाही शेतकऱ्यांकडून मागणी नसल्याने सदर प्रकल्प जनभावनेचा प्रक्षोप पाहून कायमचा रद्द करावा अशी मागणी यावेळी कलेली.

# माळेगाव तलाव फुटल्याने मच्छीमारांवरउपासमारीची वेळ

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ३ सप्टेबर-**

गेल्या आठवड्यातील अतिवृष्टीने माळेगाव येथील फुलमाळ तलाव फुटल्याने तलावातील माशा पूर्णतः वाहून गेल्याने मच्छीमार करणाऱ्या भोई समाजावर उपासमारीची वेळ आली आहे.



गेल्या पंचवीस वर्षापासून माळेगाव येथील भोई समाज फुलमाळ तलावात मच्छीमार करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असतो पण गेल्या आठवड्यात अतिवृष्टीने तलाव पूर्णता फुटल्याने त्यातील पाण्याबरोबर माशा वाहून गेलेल्या आहेत जय मल्हार मच्छीमार संस्थेत २७ सभासद आहेत त्यांच्या मार्फत मच्छीमारी करण्यात येते.यातूनच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. गेल्या आठवड्यात हा तलाव पूर्णता फोटु गेला या २७ सभासदांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे .तलावातील माशी मोठ्या व्हाव्यात या उद्देशाने त्यांनी एक वर्षापासून मच्छीमारी देखील केली नव्हती. पावसाळ्यानंतर मच्छीमारीला सुरुवात करणार होते पण अतिवृष्टीमुळे तलाव फुटून मोठे नुकसान झाले. अंदाजे दहा लक्ष रुपयाचे नुकसान झाले आहे. या कुटुंबाला नुकसान भरपाई मिळवून देण्याचे आश्वासन आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी दिले ते या तलावाची पाहणी करत असताना सर्व अधिकाऱ्यांना पंचनामा करण्याच्या सूचना देखील दिल्या. ताबडतोब तलावाची दुरुस्ती करून द्यावी असे देखील अधिकाऱ्यांना त्यांनी सूचित केले .त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष हनुमंत खंडोजी हिवरे, सचिव दत्ता मुंजाजी नंदाने यांनी आमदार प्रताप पाटील चिखलीकर व अधिकाऱ्यांना नुकसान भरपाई बाबत निवेदन दिले .

# अतिवृष्टीमुळे झालेल्या घरपडी ची नुकसान भरपाई द्या:सुनील सोनूले

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ३ सप्टेबर-**

हदगाव शहारात गत ऑगस्ट महिन्यात प्रचंड अतिवृष्टी झाल्याने अनेक गोरगरीब कुटुंबाच्या घराची पडझड झाली तर काही झोपड्याची मोडतोड झाली आहे.अशा पडझडी च्या घरात राहणे लोकांना मुश्किल झाले आहे.नुकसान ग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सदस्य,काँग्रेस नेते सुनील सोनूले यांनी मुख्याधिकारी यांना एका निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात त्यांनी म्हटले आहे की,शहरात अतिवृष्टीमुळे अनेक गोरगरीब नागरिकांचे घरे पडले आहेत झोपड्या उध्वस्त झाल्या आहेत, तसेच शहरातील अनेक वार्डा मध्ये ढगफुटी सदृश्य झालेल्या पावसाने सर्वत्र चिखल झाला आहे, गटारात पाणी तुंबल्याने डासांचे प्रमाण वाढले असून यामुळे रोगराई सुद्धा वाढणार आहे त्यामुळे सदर वार्डात मुरूम टाकावा अशी मागणी करण्यात आली असून निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांना पाठवल्या आहेत.

# शेतकऱ्यांची आक्रमक भूमिका; नायगांव तहसील समोर आंदोलनाचा इशारा

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ३ सप्टेबर-**

तालुक्यासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यात मागील काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या संततधार पावसा मुळे शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक व भौतिक नुकसान झाले आहे. यामध्ये शेती पिकांचे नुकसान,मुक्या जनावरांचा मृत्यू, घरे, गोठे, रस्ते आणि पूल यांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शासन स्तरावरून अद्याप कोणतीही ठोस मदत मिळालेली नाही.या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी किसान सभा आणि तालुक्यातील शेतकरी संघटनांनी मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री व जिल्हा प्रशासन यांना निवेदन देत ४ सप्टेंबर २०२५ पासून तहसील कार्यालय, नायगांव तहसील समोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

जिल्ह्यासह नायगांव तालुका हा ओला दुष्काळग्रस्त जाहिर करावा, २०१९ व २०२२ च्या शासन निर्णयाच्या धर्तीवर विशेष पॅकेज जाहिर करून शेतकऱ्यांना हेक्टरी छ ५०,००० आणि नदी-नाल्या लगतच्या जमिनीतील पिकांसह जमिनी देखील पुर्णतः खरडून गेल्या आहे त आशा शेतकऱ्यांना किमान१ लाख नुकसान भरपाई द्यावी. अतिवृष्टीमुळे मृत्यूमुखी पडलेल्या जनावरांची भरपाई तसेच, वाहून गेलेली शेती उपकरणे, गोठे, घरे यांची आर्थिक मदत सध्याच्या बाजारमूल्यानुसार द्यावी. घरांचे नुकसान झालेल्यांना शासन योजने अंतर्गत घरकुल मंजूर करून द्यावे. खरीप हंगाम २०२४ मधील पीकविमा रक्कमपैकी किमान ७५ टक्के रक्कम तातडीने वितरित करावी.

नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे कर्ज तत्काळ माफ करावे.शेळगांव -दुगाव रस्त्याचे अपूर्ण काम,निकृष्ट पूल त्वरित पूर्ण करून दोषी कंत्राटदार,अभियंत्यांवर तात्काळ कार्यवाही करावी. मांजरम येथील फुटलेल्या तलावाच्या कामात झाले ल्या निकृष्टपणाची चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी. बळेगाव बंधारा व गोदावरी नदीच्या बॅकवॉटरमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना जमीन ताब्यात घेत बाजार भावा नुसार मोबदला द्यावा. शेतकरी नेते पांडुरंग शिंदे मांजरमकर तालुकाध्यक्ष, लक्ष्मणराव भवरे प्रदेशप्रतिनिधी, राष्ट्रवादी किसान सभा, किरण वाघमारे तालुका सरचिटणीस यांनी संयुक्तपणे निवेदन सादर केले असून, संबंधित मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष न दिल्यास, नायगांव तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना तीव्र जन आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल, असा स्पष्ट इशारा दिला आहे.

# किनवट पंचायत समिति येथे मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान कार्यशाळा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ३ सप्टेबर-**

पंचायत समिती किनवट येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तालुकास्तरीय कार्यशाळेचे भव्य आयोजन करण्यात आले. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी शाश्वत नियोजन, पारदर्शक अंमलबजावणी आणि लोकसहभाग या तीन महत्त्वाच्या आधारस्तंभांवर भर देत या कार्यशाळेत ग्रामविकास, शिक्षण, पायाभूत सुविधा, महिला व बालकल्याण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन तसेच शाश्वत विकास या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेचे उदघाटन आमदार भिमराव केराम यांच्या शुभहस्ते पार पडले. आपल्या मनोगतात आमदार केराम यांनी सांगितले की, ग्रामपंचायत ही ग्रामीण भागातील विकासाचे खरे केंद्र आहे. ग्रामविकास विभागांतर्गत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची प्रभावी



अंमलबजावणी, पारदर्शकता आणि जनसहभाग यामुळेच ग्रामीण भागाचा चेहरा बदलू शकतो. राज्य सरकार ग्रामविकासासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील असून, प्रत्येक गाव आदर्श ग्रामपंचायत म्हणून उभे राहावे हीच अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमाला गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस, गटशिक्षणाधिकारी अनिल महामुने यांच्यासह विविध विभागांचे विस्तार अधिकारी, तालुक्यातील सर्व ग्रामसेवक, सरपंच, पंचायत समितीचे माजी सभापती दत्ता आडे, आमदार केराम यांचे स्विय सहाय्यक नीलकंठ कातले यांच्यासह मोठ्या संख्येने मान्यवर व ग्रामविकास क्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यशाळेत उपस्थित तज्ज्ञांनी ग्रामपंचायतींना समृद्ध पंचायतराज अभियानातून उपलब्ध होणाऱ्या योजनांचा कसा योग्य व प्रभावी वापर करावा, याबाबत सविस्तर माहिती दिली. यात स्वच्छ भारत अभियान, जलजीवन मिशन, हरित ग्राम योजना, महिला बचतगटांचा सशक्तीकरण उपक्रम, तसेच शालेय शिक्षण सुधारणा यांसारख्या योजनांचा संदर्भ देऊन मार्गदर्शन करण्यात आले. गावोगावी पायाभूत सुविधा उभारणी, महिला व बालकल्याण उपक्रमांची अंमलबजावणी, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण मोहिमा, तसेच आरोग्य सुविधांची उपलब्धता यांसाठी ग्रामपंचायतींनी सातत्याने पुढाकार घ्यावा, असेही मत यावेळी मांडण्यात आले. कार्यशाळेचा समारोप करताना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले की या अभियानामुळे तालुक्यातील विकासकामांना नवी गती मिळेल, ग्रामपंचायती अधिक सक्षम, पारदर्शक व आदर्श ठरतील आणि ग्रामीण भागातील नागरिकांना थेट लाभ मिळेल.

# शांतता समितीच्या बैठकीला फक्त मर्जीतील लोकांचीच हजेरी

**तभा वृतसेवा**
**सोनखेड, दि. ३ सप्टेबर-**

सोनखेड ठाणे हद्दीत एकूण ३४ च्या जवळपास गावे असून त्यातील काही गावे संवेदणशील आहेत त्या अनुषंगानेप्रत्येक सन उत्सव मध्ये शांतता बैठक घेण्यात येते आणी त्या अनुषंगाने शांतता समितीची बैठक घेतल्याही परंतु त्यामध्ये त्यांना प्रसार माध्यम प्रतिनिधीचा विसर पडल्याचे वारंवार दिसत आहे.

जिल्हा प्रशासन हे सद्यस्थितीत चालू असलेल्या गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद व तसेच मराठा आरक्षणाच्या विषयावर मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन चालू असल्यामुळे सबंध जिल्ह्यामध्ये सर्व समाजात शांतता व सलोखा नांदावा कुठेही जातीय तेढ किंवा वितुष्ट निर्माण होऊ नये कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी प्रत्येक समाजातील व प्रत्येक क्षेत्रातील प्रतिष्ठित मंडळी तसेच पदसिद्ध पदाधिकारी व लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेले प्रसार माध्यम यांच्या उपस्थितीत शांतता समितीच्या

बैठका घेतल्या जाते यामुळे की कुठे काही अडचणी असल्यास त्यावर सल्ला मसलत करून त्यावर तोडगा काढने जेणेकरून प्रशासकीय कामकाज अत्यंत व्यवस्थितरित्या करता येईल यासाठी परंतु अलीकडच्या काळात सोनखेड पोलीस स्टेशन मध्ये मात्र पोळा,गणेशोत्सव, अण्णाभाऊ साठे जयंती ईद-ए-मिलाद,यासह इतर कोणत्याही शांतता समितीच्या बैठका घेतल्या जातात परंतु त्यामध्ये पत्रकारांचा मात्र सोनखेड पोलिसांना कमालीचा विसर पडल्याचे लक्षात येत आहे त्यामुळे आले मानेच्या मना, तेथे कोणाचे चालेना....! असा कटू अनुभव सध्यातरी तथा नेहमीच येथील प्रतिनिधींना अनुभवायला मिळत आहे. पोलीस स्टेशनं मध्ये काही लोक जमा झाले की दुसऱ्या कडून कळते की आज ठाण्यात कशाची तरी बैठक बोलावली आहे ठाणे अधिकारी हे कोणत्या एका मार्जितील कर्मचाऱ्याच्या मनावर चालत आहे की काय असा प्रश्न निर्माण होत आहे ठाण्यात काही बैठका व कार्यक्रम असले तर गोपनीय शाखेच्या कर्मचाऱ्यांचे काम असते माध्यमाच्या प्रतिनिधी यांना कळविणे पण तसें होत नाही यांना माध्यमाची ऍलर्जी आहे की काय....! असे माध्यम प्रतिनिधी मध्ये चर्चा होत आहे

# अतिवृष्टीमुळे खरडून गेलेली शेतजमीन भुसंपादीत करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. ३ सप्टेबर-**

मुखेड तालुक्यातील गोणेगाव या ठिकाणी होत असलेल्या लेंडी आंतरराज्य प्रकल्पाच्या घळभरणीचे काम घाई गरबडीत करण्यात आले असल्याचा आरोप होत आहे. गेल्या आगस्ट महिन्यात ८ दिवसात दोन वेळा धरणात पाणी तुडुंब भरले. त्यामुळे घरणातील पाण्याच्या विसर्ग अतिशय वेगात झाला आणि धरण्याच्या अलीकडील शेतकऱ्यांच्या जमीनी खरडून गेल्या आहेत. सदरील जमीनीवर, माती ऐवजी दगड गोटे आणि वाळू पसरल्याने जमीन कसन्यास योग्य नसल्याने गोणेगांव व इतग्याळ (पदे ) येथील २६ शेकऱ्यांनी त्यांची ४० ते ४५ एकर जमीन लेंडी प्रशसनाना कडून भूसंपादित करावी अशी मागणी शेतकरी करत आहेत.

लेंडी प्रकल्पाचे काम गेल्या अनेक १३ वर्षापासून बंद पडले होते. सप्टेंबर २०२४ मध्ये कामाला गती मिळाली आणि घळण भरणीचे काम घाई गरबडीत झाल्याचा आरोप सर्व स्तरातून करण्यात आला. मात्र मे महिन्या झालेल्या पावसामुळे



धरणामध्ये ३०%पाणी कोडण्यात आले. परंतु ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी झाली आणि त्याचा फटका लेंडी धरण परिसरतील नागरिकांना बसला. धरणातून पाण्याचा विसर्ग झाल्यानंतर मोठ्या वेगाने पाणी येऊन धरणाच्या अलीकडील शेतकऱ्यांच्या जेमिनी खरडून गेलेले आहेत. सदर जमिनीवर दगड, गोटे, वाळू याचे साम्राज्य पसरले आहे. त्यामळे जमिनी कसन्यास व कष्ट करण्यास योग्य नसल्याने ह्या जमिनी लेंडी प्रशासनाने तसेच भूसंपादन विभागाकडून संपादित कराव्यात अशी मागणी शेतकरी करत आहेत. लेंडी प्रकल्पामुळे गोणेगांव शेत शिवारातील इटग्याळ (पदे) येथील २६ शेतकऱ्यांच्या सुमारे ४० ते ४५ एकर जमीन गट नं ५० पासून ७२ पर्यंत मधील जमिनी मधून नदीचा प्रवाह निर्माण झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. सदर जमिनीमध्ये भरडा, वाळू चे संचायन झाले आणि खाचून, खरडून, खड्डे पडल्यामुळे जमिनी मध्ये माती शिल्लक राहिली नाही. पिकांसह माती वाहून गेली त्यामुळे गोणेगांव - इटग्याळ (पदे ) येथील शेतकऱ्यावर मोठे संकट निर्माण झाले. त्यामुळे जलसंपदा विभाग, भुसंपादन विभाग, लेंडी प्रशासनाने तात्काळ या विषयाकडे लक्ष देऊन शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी शेतकरी करत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### श्रीक्षेत्र सिमूर गव्हाण येथे जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांचा दर्शन सोहळा

**बाऱ्हाळी**-जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी, जगद्गुरु रामानंदाचार्य दक्षिण पीठ नाणीजधाम यांच्या समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळयाचे आयोजन दिनांक ९ व १० सप्टेंबर २०२५ रोजी ज. न. म. संस्थान, उपपीठ मराठवाडा, श्रीक्षेत्र सिमूरगव्हाण ता. पाथरी जि. परभणी येथे सकाळी ९ वाजता आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मराठवाडा पीठ प्रमुख श्री. जयप्रकाश लोणारी, पीठ सहप्रमुख विजय देशपांडे पीठ व्यवस्थापक सुरेश मोरे यांनी एका प्रसिध्दी प्रत्रकाद्वारे दिली आहे. कार्यक्रमाच्या अनुषंगाने संस्थानाच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात जसे की, ग्रामस्वच्छता अभियान, शैक्षणिक उपक्रमांतर्गत इंग्रजी माध्यमांची मोफत शाळा, मोफत वेदपाठ शाळा, रक्तदान शिबिर, वैद्यकीय उपक्रमांतर्गत मोफत दवाखाना, आज पर्यंत १३७ जणांनी मरणोत्तर देहदान केले, ५८ जणांनी मरणोत्तर अवयव दान, मोफत रुग्णवाहिका सेवा - महाराष्ट्रात विविध महामार्गावर ५३ रुग्णवाहिका २४ तास अखंडपणे अपघातग्रस्तांच्या सेवेत कार्यरत आहेत. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे पुनर्वसन, महिला सक्षमीकरण अंतर्गत मोफत शिलाई यंत्र वाटप, मोफत घरघंटी वाटप, आपत्कालीन मदत उपक्रम, कायदेविषयक साक्षरता शिबिरे, रक्तदान शिबिर आयोजित केली जातात. या कार्यक्रमासाठी पिठ अंतर्गत जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक भक्त, साधक, शिष्य, हितचिंतक यांनी दि. ९ व १० सप्टेंबर २०२५ रोजी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रवचन व दर्शन सोहळ्याचा लाभ घ्यावा. या कार्यक्रमात दिनांक ९ सप्टेंबर ला उपासक दीक्षा व दि. १० सप्टेंबर रोजी साधक दीक्षा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी जास्तीत जास्त भाविकांनी उपासक दीक्षा व उपासक यांनी साधक दीक्षा घेण्यासाठी नोंदणी करावी. या समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळयासाठी येणाऱ्या भाविकांसाठी कार्यक्रमाच्या दोनही दिवस महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी या महंन्मंगल समयी आपण सर्वांनी सहकुटुंब, सहपरिवार, आप्तइष्ट मित्रांसह उपस्थित राहून परमश्रद्धेय जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रवचन व दर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन मराठवाडा पीठ समिती व जिल्हा सेवा समितीच्या पदाधिकारी यांनी केले आहे.

### मुंबईच्या मराठा आंदोलनात सहभागी तरुणांचा चक्री ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

**निवघा**-राज्यातील मराठा बांधवांनी मराठ्यांचे संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांच्या नेतृत्वात मुंबईत आरक्षणाच्या हक्कासाठी दिलेला लढा अखेर यशस्वी झाला. जरांगे पाटलांच्या आठ पैकी सहा मागण्या राज्य सरकारने मागण्या मान्य केल्या. मराठा आरक्षणाचा तिढा सोडवून मराठा बांधवांना दिलासा देणारा हा निर्णय घेण्यात आल्याने अखेर मराठा आरक्षणाचा संकल्प पूर्ण झाला. मुंबई येथे आंदोलनात सहभागी झालेल्या चक्री येथिल मराठा बांधवांचे कौतुक म्हणून चक्री येथिल सकल मराठा समाजाच्या वतीने भानू पाटील, सुनील पाटील,गजू पाटील, अमोल पाटील, अनिल पाटील, यांचा फटाक्यांच्या आतषबाजीसह गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा करत सत्कार करण्यात आला यावेळी शेकडो मराठा तरुण उपस्थित होते



### ग्राहक तक्रार वितरण मंच नांदेड परिमंडळ सदस्य पदी डोम्पले यांची नियुक्ती

**नवीन नांदेड** -महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी ग्राहक तक्रार वितरण मंच नांदेड परिमंडळाच्या सदस्य पदी सिडकोतील येथील रहिवासी सामाजिक कार्यकर्ते माधव डोम्पले यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. सिडको येथील रहिवासी सामाजिक कार्यकर्ते युवा उद्योजक माधव डोम्पले यांची महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी ग्राहक तक्रार वितरण मंच नांदेड परिमंडळ कार्यक्षेत्रासाठी स्वायता सदस्य पदी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग मुंबई यांनी नांदेड येथील उच्च शिक्षित प्रसिद्ध युवा उद्योजक माधवराव डोम्पले यांची सदस्य पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे मीत्रमंडळ,समाज बांधव यांनी डोम्पले यांच्या निवढी बद्दल पुढील कार्यास शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.



### श्री स्वामी समर्थ आध्यत्मिक कार्यक्रमात गायक गजानन बेंडे यांचा सत्कार

**धर्माबाद**-धर्माबादचे भूमिपुत्र गजानन बेंडे यांनी गायनात आपली चांगला च ठसा उमटवत आहेत धार्मिक गीत गाऊन सर्व लोकांचे मन मंत्रमुग्र करत आहे. श्री स्वामी समर्थ श्री अनंत कोटी ब्रहमांड नायक राजा धीराज योगी राज परमा ब्रहम सचिनद्दी नंद सदगहल श्री स्वामी समर्थ महाराज त्र्येबंकेश्वर गुरु पीठ जालना ठिकाणी श्री स्वामी समर्थ केंद्र तुळजा भवानी नगर या ठिकाणी आध्यत्मिक कार्यक्रमात आपले कार्य सिद्धीकारक श्री चक्रराज यंत्र या निर्मिताने मराठवाडा विभाग अंतर्गत गृहपुत्र धार्मिक गुरु पुत्र नितीन भाऊ यांच्या प्रमुख उपस्थितीत गजानन बेंडे गायक यांनी श्री स्वामी समर्थ महाराजाचे सुंदर असे भिक्ती गीत माझी आई अक्कलकोट भिऊ नका मी आहे पाठी सुंदर सा भावनिक भक्ती गीताने नितीन भाऊ व सेवेकरी बंधूभागनींना मंत्रमुग्र केले यामुळे आपल्या मराठवायचे ग्रहपुत्र नितीन भाऊ यांनी गायक गजानन हिरालाल बेंडे यांचा सत्कार करण्यात आला यावेळी गणेश घुंगे, पुरुषोत्तम भुबरे, नाना भाऊ उगले, केरळकर, तुषार माळवतकर, दत्ता शागडकर हे उपस्थित व सर्व सेवेकरी मोठया संख्येने होते.



### सेवादास गणेश मंडळातर्फे अन्नदान परंपरा कायम

**किनवट** -शहरातील प्रमुख गणेश मंडळांपैकी एक असलेल्या सेवादास गणेश मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सामाजिक व धार्मिक उपक्रमांची परंपरा जोपासण्यात आली आहे. काँग्रेस नेते तथा माजी उपनगराध्यक्ष अभय महाजन यांच्या अध्यक्षतेखालील या मंडळाने गणरायाच्या स्थापनेपासून ते अनंत चतुर्दशीपर्यंत सलग ११ दिवस अन्नदान करण्याची परंपरा कायम ठेवली आहे.